आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, २ मार्च २०२३

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०२ अंक -१८५

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●THURSDAY 02 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-185 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5


# महागाईचे 'चटके': गॅस दरवाढीचा भडका



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : बुधवार दि. 1 मार्चपासून 14.2 किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरची किंमत 50 रुपयांनी वाढली आहे. दिल्लीत याची किंमत 1103 रुपयांवर गेली आहे. होळीपूर्वी सामान्य जनतेसाठी हा मोठा धक्का आहे. 19 किलोच्या व्यावसायिक सिलिंडरच्या किंमतीत 350.50 रुपयांची वाढ करण्यात आली आहे. दिल्लीत 19 किलोचा व्यावसायिक सिलिंडर आता 2119.50 रुपयांना मिळेल. गेल्या वर्षभरात घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत एकूण ५ वेळा बदल झाला आहे. 22 मार्च 2022 रोजी सिलिंडरची किंमत 50 रुपयांनी वाढल्यानंतर दिल्लीत 899.50 रुपयांवरून 949.50 रुपयांवर पोहोचली होती.**

तेल विपणन कंपन्यांनी 7 मे 2022 रोजी किंमत 50 रुपयांनी वाढवली, ज्यामुळे ती 999.50 रुपयांवर पोहोचली. त्याच महिन्यात 19 मे रोजी पुन्हा 2.50 रुपयांनी वाढ करण्यात आली. यानंतर किंमत 1003 रुपये झाली. 6 जुलै 2022 रोजीही सिलिंडरच्या किमतीत 50 रुपयांनी वाढ करण्यात आली होती. या वाढीनंतर किंमत 1053 रुपये झाली होती. आता पुन्हा एकदा 50 रुपयांनी वाढ करण्यात आली असून, त्यामुळे सिलिंडरची किंमत 1103 रुपयांवर गेली आहे. म्हणजेच गेल्या वर्षभरात किंमत 203.50 रुपयांनी वाढली आहे.

## दरवाढीविरोधात महाविकास आघाडीचे आमदार आक्रमक



**मुंबई :** शेतकऱ्यांची वीज तोडणी बंद करा... घरगुती गॅस दरवाढ करणाऱ्या सरकारचा धिक्कार असो... शेतकरीद्रोही सरकारचा निषेध असो... शेतकऱ्यांची वीज तोडणाऱ्या सरकारचा धिक्कार असो... शेतकऱ्यांना १२ तास वीज द्या नाहीतर खुर्च्या खाली करा... वीजेवाचून पंप नाही पंपावाचून पीक नाही, पिकावाचून मरतोय शेतकरी, सरकारला देणे घेणे नाही. शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळालीच पाहिजे. शिंदेसरकारने केले काय, जाहिरातीशिवाय दुसरे काय... पिकाला नाही पाणी, मालाला नाही भाव, अरे सरकारा कधीतरी बळीराजाला पाव... महाराष्ट्राची बत्ती गुल, खोके सरकारचे खिसे फूल... अशा गगनभेदी घोषणा देत महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर येत आजही शिंदे - फडणवीस सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी कांदा आणि कापसाच्या मुद्दा लावून धरल्यानंतर आज तिसऱ्या दिवशी वीजेच्या आणि गॅस दरवाढ प्रश्नावर महाविकास आघाडीचे आमदार आक्रमक झालेले पहायला मिळाले. चोर मचाये शोर अशा आशयाचे बॅनर फडकवून वीज प्रश्नावर आघाडी सरकारच्या काळात आंदोलन करणाऱ्या आमदार प्रसाद लाड, राम सातपुते, प्रवीण दरेकर यांचा निषेध करण्यात आला. विरोधी पक्षनेते अजित पवार आणि अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली आजही महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर येत शिंदे सरकारला सळो की पळो करून सोडले.

# डायबिटीज, ब्लड प्रेशरच्या औषधांची दर निश्चिती

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** केंद्र सरकारच्या राष्ट्रीय औषधी मूल्य निर्धारण प्राधिकरण (NPPA) या विभागाने मधुमेह, उच्च रक्तदाब यांसारख्या आजारांवर घेतल्या जाणाऱ्या ७४ औषधांचे दर निश्चित केले आहेत. या संबंधित प्राधिकरण विभागाची महत्त्वपूर्ण बैठक २१ फेब्रुवारी रोजी घेण्यात आली. या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयांच्या आधारे ऑर्डर २०१३ अंतर्गत किरकोळ औषधांच्या किंमती निश्चित केल्या गेल्या. NPPA या विभागाने रक्तातील ग्लुकोजचे प्रमाण नियंत्रित राहावे यासाठी घेतल्या जाणाऱ्या Dapagliflozin, Sitagliptin आणि मधुमेहावरील Metformin Hydrochloride यांच्या एका टॅब्लेटची किंमत २७.७५ रुपये असेल अशी घोषणा करण्यात आली. तसेच उच्च रक्तदाबावर उपयुक्त असलेल्या Telmisartan, Bisoprolol Fumarate या औषधांची किंमतही कमी करण्यात आली आहे. या औषधांच्या एका टॅब्लेटसाठी ग्राहकांकडून १०.९२ रुपये आकारले जाणार आहे. प्राधिकरण विभागाने ८० अधिसूचित केलेल्या औषधांच्या दरांमध्ये बदल करण्याचे आदेश दिले आहेत. न्युट्रोपेनिया आणि एपिलेप्सी अशा आजारांवर उपचार म्हणून दिल्या जाणाऱ्या औषधांचाही या यादीमध्ये समावेश आहे. NPPA द्वारे Filgrastim injection (one vial) १,०३४.५२ रुपयांना असेल असे ठरवण्यात आले आहे. तसेच Sodium Valproate (20mg) या औषधाची किंमत देखील कमी करण्यात आली आहे. सध्या त्याची एक टॅब्लेट ३.२० रुपयांना मिळणार आहे. Hydrocortisone च्या दरामध्येही घट झाली आहे. याच्या एका टॅब्लेटची किंमत १३.२८ रुपये असणार आहे.

सरकारच्या या विभागाद्वारे मोठ्या प्रमाणामध्ये तयार होणाऱ्या औषधांचे दर निश्चित करणे, त्यांमध्ये सुधारणा करणे तसेच देशभरात योग्य दरात औषधे उपलब्ध करुन देणे अशी कामे केली जातात. केलेल्या नियमांची अंमलबजावणी करणे, औषधांच्या किंमतीवर नियंत्रण ठेवणे यांसारख्या कामांमध्येही हा विभाग सक्रिय असतो.

# महिलांना फुकटात प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** वुमन्स प्रीमियर लीग स्पर्धेला चार मार्चपासून सुरुवात होणार आहे. मुंबई आणि गुजरात यांच्यामध्ये नवी मुंबईतील डी वाय पाटील स्टेडिअमवर पहिला सामना रंगणार आहे. महिला आयपीएलचे सर्व सामने मुंबईतील मैदानात रंगणार आहेत. त्यासाठी तिकिटविक्रीला सुरुवात झाली आहे. बूक माय शो येथे या स्पर्धेची तिकिटं उपलब्ध आहेत. वुमन्स प्रीमियर लीग पाहण्यासाठी महिलांना आणि मुलींना मोफत प्रवेश दिला जाणार आहे. या स्पर्धेच्या सर्व 22 सामन्यासाठी महिलांना मोफत प्रवेश दिला जाणार आहे. मुंबई आणि गुजरात या संघामध्ये वुमन्स प्रिमियर लीगमधील पहिला सामना रंगणार आहे. या स्पर्धेत होणाऱ्या 22 सामन्यासाठी तिकिट विक्रीला सुरुवात झाली आहे. या स्पर्धा पाहण्यासाठी महिला आणि मुलींना निशुक्ल प्रवेश दिला जाणार आहे. पुरुषांसाठी तिकिटाची किंमत 100 रुपये ते 400 रुपये इतकी असेल. नवी मुंबईत डी वाय पाटील स्टेडिअमवर झालेल्या भारत-ऑस्ट्रेलिया महिला T20 मालिकेदरम्यान महिलांना मोफत प्रवेश देण्यात आला होता. तर पुरुषांसाठी नाममात्र दर देण्याचा निर्णय बीसीसीआयने घेतला होता. बीसीसीआयच्या याच धोरणाशी सुसंगत निर्णय वुमन्स प्रीमिअर लीगच्या सामन्यासाठी घेण्यात आला आहे. महिला क्रिकेटबद्दल लोकांमध्ये अधिक रुची निर्माण व्हावी, यासाठी असा निर्णय घेण्यात आला आहे.

# डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने स्वच्छता अभियान!







आधुनिक केसरी न्यूज

छत्रपती संभाजीनगर : डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा, ता.अलिबाग,जि. रायगडच्या वतीने डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षपूर्ती निमित्त स्वच्छता अभियान छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय कार्यालयात बुधवार दि.१ मार्च रोजी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

शहरातील शासकीय कार्यालयात आज सकाळी ७ च्या सुमारास या स्वच्छता अभियानाला श्री सदस्यांनी शुभारंभ केला. दोन तास चाललेल्या या स्वच्छता अभियानात शहरातील वनविभाग कार्यालय, जिल्हा परिषद ,छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती बस स्थानक, पोलीस आयुक्त कार्यालय , सरकारी कॅन्सर हॉस्पिटल, सरकारी दवाखाना चिकलठाणा , पंचायत समिती , जीएसटी भवन तसेच विद्यापीठ गेट परिसर चकाचक करण्यात आला. अतिशय नियोजनबद्ध आणि शिस्तीत श्री सेवकांनी हे अभियान राबविल्यामूळे नागरिकांमध्ये जनजागृती झाली व अनेक नागरिकही या अभियान सहभागी झाल्याचे दिसून आले.सकाळी - सकाळीच हे अभियान राबविण्यात आल्यामुळे शाळा-महाविद्यालयात जाणारे मुलेही हे नेमके काय सूरू आहे ?आणि हे कार्य करणारे आहेत तरी कोण ? हे जाणून घेत असल्याचेही ठिकाणठिकाणी दिसून येत होते. आजच्या स्वच्छता अभियानात प्रत्येक शासकीय कार्यालयात 40 ते 45 श्री सदस्य उपस्थित होते. सर्व सदस्यांनी मास्क परिधान केलेले होते. प्रत्येकांनी स्वच्छतेसाठी लागणारे साहित्य आपापल्या घरून आणले होते. विशेष म्हणजे या अभियानात जमा झालेले सर्व कचरा व्यवस्थितपणे एकत्र जमा करून तो कचरा डेपोत नेऊन टाकण्यात आला. नुकतेच डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती संभाजीनगरात महास्वच्छता अभियान राबविण्यात आले होते. आता पुन्हा शासकीय कार्यालयात स्वच्छता अभियान राबविण्यात आल्याने शहर स्वच्छतेत मोलाची भर पडली आहे, असे नागरिकांकडून बोलले जात आहे.


### नंदुरबार येथे54 टन कचरा संकलन

नंदुरबार शहरात खोडाई माता मंदिर परिसर, अंधारे स्टॉप, महाराणा प्रताप पुतळा, बस स्टॅन्ड परिसर व कृषी उत्पन्न बाजार समिती रोड ते जगतापवाडी चौफुली पर्यंत स्वच्छता करण्यात आली असून जिल्ह्याभरात आज शहादा, तळोदा, अक्कलकुवा, धडगाव, दोंडाईचा, खेतिया व सोनगढ येथेही स्वच्छता अभियान राबविण्यात आले . या अभियानात प्रतिष्ठानचे 539 श्रीसदस्य सहभागी झाले . असून त्यात 25 कि मीटरचे रस्ते स्वच्छ केले व 54 टन कचरा संकलन करून 17 ट्रॅक्टर व 3 घंटा गाडीच्या साहाय्याने डांपिंग ग्राउंडवर टाकण्यात आला .

### जालना येथे20 टन कचरा उचलण्यात आला

जालना शहरात छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे न . प . मुख्याधिकारी संतोष खांडेकर, स्वच्छता निरीक्षक पवार साहेब, नगरसेवक विनोद भगत, राज स्वामी, दत्ता पाटील शिंदे यांच्या उपस्थितीत महा स्वच्छता अभियानास सुरुवात झाली . पाच घंटागाडी व दोन ट्रॅक्टर व एक टिप्परच्या साह्याने कचरा उचलण्यात आला . सुखा कचरा 12 .5 टन आणि ओला कचरा 7 .5 टन असा एकूण 20 टन कचरा उचलण्यात आला व शहर स्वच्छ झाले .

# उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




## माती भिडली आभाळा

आधुनिक केसरी

ख्रिस्ती धर्म जसा जगभर पसरला, तसा वारकरी पंथ पसरला असता, तर ख्रिस्ताच्या क्रुसाप्रमाणे हा स्तंभही जगभर गेला असता. पण बरे झाले तसे नाही झाले ते. तो इथेच राहिला. वारकऱ्यांना त्याचे दर्शन घ्यायला इथेच यावे लागते. ' ज्ञानेश्वरी इथे सांगितली गेली म्हणून वारकरी संप्रदायाचे हे आद्य पीठ आहे. पण माऊलींनी ज्ञानेश्वरी सांगितल्यानंतर साधारणपणे तेरा ते एकोणिसाव्या शतकापर्यंत हे अत्यंत पवित्र असे स्थान विपन्नावस्थेत होते. संत ज्ञानेश्वरांची कर्मभूमी असलेले हे स्थान ! या स्थानाची लोकांना विस्मृती झाली होती. या स्थानाला उर्जितावस्थेत आणण्यासाठी एखाद्या समर्पित त्यागी साधकाची आवश्यकता होती. आज हे स्थान आपल्याला आपल्याला ऐश्वर्यसंपन्न भासते त्यामागे वारकरी संप्रदायाचे महान उपासक वै. सोनोपंत दांडेकर मामांचे शिष्य ह.भ.प. बन्सी महाराज तांबे यांचे मोठे योगदान आहे. पैठणहून आळंदीला जाताना ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपान आणि मुक्ताबाईंनी या ठिकाणी काही दिवस मुक्काम केला. असे म्हणतात की पैठणला ज्या रेड्याकडून ज्ञानेश्वर माऊलींनी वेद वदवून घेतले, तो रेडा देखील या ठिकाणी त्यांच्या सोबत होता. इथेच निवृत्तीनाथांनी ज्ञानोबा माऊलींना ज्ञानेश्वरी लिहिण्याची आज्ञा दिली. इथेच त्यांना तसे का वाटावं ? तर या स्थानाचा महिमाच तसा होता. या ठिकाणी साक्षात श्री विष्णूंनी मोहिनीरूपात दहा दिवस निवास केला होता. त्यांनी निवास केला म्हणून हे ' नेवासे ' असे म्हटले जाते. त्या मोहिनीराजांचं सुंदर हेमाडपंती मंदिर इथे आहे. समुद्रमंथनातून जेव्हा चौदा रत्ने बाहेर पडली, तेव्हा त्यात अमृताचा कलश हाती घेऊन धन्वंतरी प्रकट झाले. अमृत हे अमरत्व प्रदान करणारे होते. म्हणून देव आणि दानव यांच्यात अमृत वाटपावरून भांडणे सुरु झाली.

# आनंदी पहाट



## देव प्रथम माणसातच शोधावा

आधुनिक केसरी

आपल्या प्रत्येकालाच घरातल्या देव्हाऱ्यातील देवाचं अस्तित्व, महत्व, महात्म्य अगदी लहानपणापासून माहिती असतं, कमी अधिक प्रमाणात ते कळलेलं असतं. त्यामुळे आपल्या मनातील देव म्हणजे आपलं देवघर आणि जो देवघरांत असतो, दिसतो तो म्हणजेच देव. अशी आपली मनोधारणा असते, त्याची आपण केलेली ती देवाची व्याख्या असते. का बरं आपण देवाची इतकी संक्षिप्त व्याख्या करत असतो ? लहानपणापासून आपल्याला घरातल्या देव्हाऱ्यातलाच देव दाखवलेला असतो म्हणून का ? पितांबर नेसलेला, कर्ण कुंडले घातलेला, सोन्याच्या दागिन्यांनी मढलेला, हिरेजडीत मुकुट घातलेला जो असतो तो म्हणजेच देव, असं लहानपणापासून आपल्या अंतर्मनावर बिंबवलं जात असतं, म्हणून तोच देव असतो का ? देव्हाऱ्यात स्थानापन्न झालेल्या मूर्तींना सांग्रसंगीत पूजाविधीच्या सर्व सोपस्कारांना स्वीकारून देव देव करणारे संख्येनं कमी नाहीत, ज्यांना घरातल्या माणसातला देव दिसत असेलच असं नाही. आपण देव नाही असं मानण्याची गरज नाही. पण कोणत्या कारणामुळे, कोणत्यावेळी, कोणत्या ठिकाणी त्या देवाचं दर्शन होईल, हे मात्र कोणालाच माहिती नसतं, सांगता येत नसतं. आपण नेहमीच दृश्य गोष्टींवर भरवसा ठेवत असतो, अशी वस्तू दिसल्यानंतरच आपण ती आहे असं म्हणत असतो, त्याचं अस्तित्व मान्य करत असतो. केवळ देव हीच एक अशी बाब आहे कि जी न दिसता देखील आपण मान्य करत असतो. केवळ आपल्या अंतर्मनानं ते मान्य केलेलं असतं म्हणून जे दिसत नाही ते देखील आपण असल्याचं सिद्ध करण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असतो. ह्यामध्ये अनेकदा आपल्या मनाचे, कल्पनेचे खेळ खेळत असतो; असं म्हंटलं तर नक्कीच वावगं ठरणार नाही.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**आनंद गोंदन | जन्मोजन्मी ||**

आनंदाचे गीत | अंतरी फुलते ||
कर्मात डोलते | धून त्याची ||१||
मनाच्या तळाशी | नांदावा सद्गुण ||
जाळावा दुर्गुण | अंतर्बाह्य ||२||
संतांच्या वाणीत | सापडतो मार्ग ||
जन्म होतो स्वर्ग | याच जन्मी ||३||
मौनाच्या मंदिरी | अध्यात्म रमते ||
स्थितप्रज्ञ होते | आयुष्य हे ||४||
प्रारब्धा लाभते | मोक्षाचे आंदन ||
आनंद गोंदन | जन्मोजन्मी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी

**श्रवणाने अंतरंगात बदल घडून येतो. दुष्टाची दुष्टबुध्दी नाहींशी होते.श्रवणातून मनन व मननातून निदिध्यास उत्पन्न होतो. आणि निदिध्यासनानें आत्मसाक्षात्कार घडून येतो. श्रवणाने जे बध्द असतात ते मुमुक्षु बनतात व जे मुमुक्षु असतात ते साधक बनून अति नियमपूर्वक साधना करतात व परमानंद मिळवतात.नित्य श्रवण भक्तीत राहिल्याचा हा फार मोठा फायदा आहे.**




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**माया जग जननी भने, सृष्टि करें निरमाण । पार कोई पावे नहीं, सहज योग परमाण ।।३१।।(स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/३१**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**


माया जगत् जननी आहे. तीच सृष्टी निर्माण करते. तीचा थांग कोणालाही समजू शकत नाही. एकमात्र सद्गुरूंच्या सहज योगाने ( विहंगम योगाने ), आत्मा प्रकृती मंडलापासून उपरम होतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# काव्य-चरितावली



पुष्प १६वे

आधुनिक केसरी

**हे येहळेगाव आहे कुठे, अंतर किती ?
श्रीमहाराजांनी याची चवकशी केली
कठीण होते गाठणे, मजल भारी होती
परी गुरूभेटीची तळमळ अंतरी होती ।।
ई.स. १८५८-५९ चा काळ सारा तो
प्रवासा अजिबात अनुकूल ही नव्हता
पायी प्रवासा योग्य रस्ता स्थिती नव्हती
होती श्रीमहाराजांच्या मनाची निश्चयी वृत्ती ।।
पहिला मुक्काम पैठण, पुढे औरंगाबाद
जालना प्रवासात एक योगी भेटला
मनशांती मिळण्या नामस्मरण कर
श्रीमहाराजांनी हा उपदेश त्यास केला ।।
नांदेडला आल्यावर गोदावरी स्नान झाले
तेथूनी निघून महाराज येहळेगावी पोंचले
म्हणे -कवी अरुणदास, इथेच जन हो
श्रीमहाराजांना "तुकामाई"गुरू भेटले ।।**




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# नाम घेण्याचा निश्चय करावा

आधुनिक केसरी

जे दृश्य असते ते आज ना उद्या नाश पावते. दृश्य हे स्वतंत्र नसते. भगवंताच्या अधीन असते. म्हणून, जगात जी जी गोष्ट घडते ती ती भगवंताच्या इच्छेनेच घडते हे आपण ओळखावे. आपला देह दृश्यच आहे, आणि त्याला चालविणारा भगवंत देहात आहे; त्याच्या अनुसंधानात राहण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. हे अनुसंधान राहणे भगवंताच्या नामाने साधते, म्हणून तुम्ही सर्वांनी नाम घेण्याचा निश्चय करावा.

आपले चित्त नामामध्ये गुंतले म्हणजे देहाला प्रारब्धाच्या स्वाधीन करता येते. ही युक्ति ज्याला साधली त्याला सुखदुःखाची बाधा उरली नाही. संतांना देखील त्यांचे प्रारब्ध भोगावे लागते, पण त्यांना देहबुद्धी नसल्याने भोगाचे सुखदुःख होत नाही. व्यवहाराच्या मार्गाने जात असता भगवंताचे नाम कधी विसरू नये. आपल्या प्रयत्नाला जे फळ येईल ती भगवंताची इच्छा समजून, जे पदरात पडेल त्यात समाधान मानावे. आपण प्रपंची लोक आहोत, म्हणून प्रपंचाला उचित असणारा प्रयत्न केल्यावाचून कधी राहू नये. पण प्रपंच हेच आपले सर्वस्व आहे हे न समजता, त्यामध्ये भगवंताला विसरू नये. परमार्थाला सदाचरणाची फार जरूरी आहे. उगीच भलत्याच्या सांगण्याला भुलू नये, आणि अनीति-अधर्माच्या



मार्गाला जाऊ नये. संत जे सांगतात त्याच्यावर विश्वास ठेवून, मुखात नाम ठेवावे आणि सदाचरणाने वागून प्रपंच करावा. असे जो वागेल त्याचे कल्याण राम खात्रीने करील हे मी सर्वांना वचन देतो. बहुतेकांना प्रपंचासाठी देव पाहिजे असतो. खरोखर, हे सर्व हिंग-जिऱ्याचेच गिऱ्हाईक आहेत; देवासाठी देव पाहिजे असे म्हणणारा खरा कस्तुरीचा चाहताच कोणी भेटत नाही. जो बरा होणार नाही अशा रोग्याला बरा करतो तो डॉक्टर खरा. अगदी विषयातल्या माणसांनासुद्धा जो बाहेर काढतो तो संत खरा. त्याच्याजवळ जाऊन नुसते 'मी शरण आलो आहे' असे म्हटले तरी पुरे होते. हल्लीच्या आणि पूर्वीच्या प्रपंचात तसा फरक नाही; पण पूर्वी लोक देवाला विसरत नसत, अलिकडे ते जास्त संकुचित झाले आहेत. पूर्वी खेडेगावामध्ये स्वाभाविकपणे एकमेकांच्या उपयोगी पडावे अशी बुद्धी असायची, पण आता काळ पालटला आहे. तुम्हा इतक्या लोकांना नामस्मरण करताना पाहून मला एक समाधान वाटते की, मला जी गोष्ट आवडते ती इतक्या लोकांना आवडू लागली आहे. मी सांगितलेले तेवढे करीन असा निश्चय करा. कशाचीही काळजी करू नका. मी तुमचा भार घेतलेला आहे ही जाणीव ठेवून आनंदाने प्रपंच करा.

**आजचे बोधवचन आहे - भगवंताच्या नामाचा नाद लागला तर दुःखाची जाणीव कमी होईल.**

# तुकाराम गाथा


आधुनिक केसरी

नेणे शब्द पर । तुका म्हणे परउपकार ॥३॥
जया नाहीं नेम एकादशीव्रत । जाणावें तें प्रेत शव लोकीं ॥१॥
त्याचें वय नित्य काळ लेखीताहे । रागें दात खाय कराकरा ॥ध्रु.॥
जयाचिये द्वारीं तुळसीवृंदावन । नाहीं तें स्मशान गृह जाणां ॥२॥
जये कुळीं नाहीं एक ही वैष्णव । त्याचा बुडे भवनदीतापा ॥३॥
विठोबाचें नाम नुच्चारी जें तोंड । प्रत्यक्ष तें कुंड रजकाचें ॥४॥




मराठी भाषेचा पुळका...
चिंता आणि चिंतन पान ६

# आधुनिक केसरी



पीडित भगिनींचे पुनर्वसन व नवजीवन उभारणी पान ७

गुरुवार, २ मार्च २०२३

३







# गोरगरीब जनतेच्या आरोग्यासाठी आवश्यकता हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखान्याची !

## रुग्णालय शहरापासून 3 किमी दूर : रुग्ण सुविधेपासून वंचित




आधुनिक केसरी न्यूज

**पुर्णा :** शहरातील लोकसंख्या सन २०११ यावर्षी झालेल्या जनगणने नुसार ३६४३३ होती या लोकसंख्येत आज सन २०२३ या वर्षात वाढ होऊन शहराची जनसंख्या जवळपास अंदाजे ४५ ते ५० हजाराच्या आसपास वाढली असल्याचा अंदाज आहे या लोकसंख्येच्या प्रमाणात यात गोरगरीब जनसामान्यांचे प्रमाण अंदाजे ३५% ते ४०% एवढे असून यात रोजमजूर/शेतमजूर किरकोळ व्यवसायिक हातावर पोट असलेल्या हमाल मापाडी आदींचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असून अश्या लोकांची संख्या शहरातील आण्णाभाऊ साठे नगर, कोळीवाडा, अजिज नगर, मस्तानपुरा/नवी आबादी, विजय नगर, छत्रपती शिवाजी महाराज नगर परिसरातील थुना नदी काठावरील नवीन वसाहत, डोबी गल्ली, भिमनगर, कुंभार गल्ली, शास्त्री नगर आदी भागांचा समावेश असून या भागातील सर्वसामान्य गोरगरीब जनतेला शासकीय ग्रामीण रुग्नालय शहरापासून तब्बल ३ किलोमीटर अंतरावर असल्यामुळे शासकीय आरोग्य सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. पुर्णा-ताडकळस राज्य महामार्गावरील शासकीय ग्रामीण रुग्नालयात उपचार घेण्यासाठी जाणाऱ्या शहरातील नमूद वसाहतींतील गोरगरीब सर्वसामान्य रुग्नांसाठी खर्चाची बाब असल्यामूळे असंख्य गोरगरीब रुग्न तज्ञ डॉक्टरांचा सल्ला न घेता आपला मोर्चा नाईलाजास्तव मेडीकल स्टोअर ( औषधी दुकान ) कडे वळवत असल्यामुळे अनेक रुग्नांना वेळेवर औषधोपचार मिळत नसल्यामुळे देखील आपले प्राण गमवावे लागत आहेत याही पेक्षा गंभीर बाब म्हणजे शासकीय ग्रामीण रुग्नालयात प्रसुती ( डिलेव्हरी ) साठी जाणाऱ्या महिला रुग्नांसह सोबतच्या नातेवाईकांना देखील आपला जिव अक्षरशः मुठ्ठीत तिन किलोमीटरचा प्रवास करावा लागत असून यानंतर देखील वेळेवर योग्य उपचार मिळेल याची अपेक्षा नसल्यामुळे शासकीय ग्रामीण रुग्नालय शहरातील सर्वसामान्य गोरगरीब जनतेसाठी 'असून खोळंबा नसून वळंबा' अशी अवस्था झाली असल्यामुळे शहरातील गोरगरीब सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्य सुविधांचा गंभीर प्रश्न सुटावा याकरिता शहरात हिंदुहृदय सम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजने अंतर्गत शासकीय रुग्नालयाची तात्काळ निर्मिती व्हावी या दृष्टीने जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्यासह जिल्हा आरोग्य विभागाने पाऊल उचलावी अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे.



# 'वसंतोत्सवा'ची पुनश्च मेजवानी

## १२ मार्चला होणार सादरीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अनेक वर्षांच्या खंडानंतर नुकताच वेरूळ-अजिंठा आंतरराष्ट्रीय महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला असला तरी शहरातील रसिकप्रेमींच्या आनंदात भर टाकण्यासाठी 'वसंतोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. येत्या १२ मार्चला या स्वर मेजवानीचे आयोजन करण्यात आले आहे.

१२ मार्च रोजी छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंगमंदिर येथे वसंतोत्सव हा बहारदार कार्यक्रम रात्री ९ वाजता रंगणार आहे. या कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक पुनीत बालन ग्रुप हे आहेत. ज्येष्ठ गायक पं. वसंतराव देशपांडे यांना समर्पित या कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात लोकप्रिय गायक राहुल देशपांडे हे शास्त्रीय गायन सादर करणार आहेत. त्यांना तबल्यावर प्रसाद पाध्ये आणि हार्मोनियमवर आदित्य ओक साथसंगत करणार आहेत. दुसऱ्या सत्रात "द राहुल देशपांडे कलेक्टिव" हा कार्यक्रमात सादर करणार असून यामध्ये राहुल देशपांडे व त्यांच्या भगिनी दिप्ती माटे त्यांच्याबरोबर चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध सदाबहार गीते सादर करणार आहेत. प्रसाद पाध्ये ( तबला ), आदित्य ओक ( हार्मोनियम ), रोहन वणगे ( ऑक्टोपॅड ), ( कीबोर्ड ) हे या कार्यक्रमातील सहकलाकार आहेत. लोकप्रिय गायक राहुल देशपांडे यांच्या या वेगळ्या कार्यक्रमाचा आनंद रसिक श्रोत्यांना घेता येणार आहे. या कार्यक्रमाला एम. आय. टी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी हे आयोजक असून, लोकमान्य मल्टिपर्पज, मगरपट्टा सिटी ग्रुप, सुहाना, एंड्रेस हॉसर यांचे सहकार्य लाभले आहे. सदर कार्यक्रमाच्या प्रवेशिका बुक माय शोवर उपलब्ध आहेत.

# महाराष्ट्रात बीआरएसने सहा विभागीय समन्वयक नेमले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** तेलंगना राज्याचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखरराव यांच्या भारत राष्ट्र समिती अर्थात बीआरएसने महाराष्ट्रात सहा विभागीय समन्वयक नेमले आहेत, अशी माहिती चेन्नुरचे आ.बी. सुमन यांनी दिली. या समन्वयकांच्या माध्यमातून महाराष्ट्रभर भारत राष्ट्र समितीने जाळे विणन्याचे काम करावे, अशी सूचना पक्षाच्यावतीने देण्यात आली आहे.



भारत राष्ट्र समितीच्या हैद्राबाद येथील मुख्य कार्यालयातून प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे की, बीआरएसने नाशिक विभागाच्या समन्वयकपदी दशरथ सावंत ( अहमदनगर ), पुणे विभागाच्या समन्वयकपदी बाळासाहेब जयराम देशमुख ( पुणे ), मुंबई विभागाच्या समन्वयकपदी विजय तानाजी मोहिते ( रायगड ), औरंगाबाद विभागाच्या समन्वयकपदाची जबाबदारी अहमदनगरचे सोमनाथ थोरात यांच्यावर सोपविण्यात आली आहे. तसेच अमरावती विभागाचे समन्वयक म्हणून निखील देशमुख ( अमरावती ) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भारत राष्ट्र समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखरराव यांच्या स्वाक्षरीनिशी महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, मुंबई, औरंगाबाद, नागपूर व अमरावती या विभागातील समन्वयकांची घोषणा करण्यात आली आहे. जहिराबादचे खा. बी.बी.पाटील, चेन्नूरचे आ.बलकासुमन, बोधनचे आ.शकिल, भारत राष्ट्र समितीचे किसान सेल महाराष्ट्र अध्यक्ष माणिक कदम यांच्यासह इतरांनी समन्वयक निवडीसाठी मोलाची भूमिका घेतली.

# सभागृहाचे कामकाज स्थगित करुन जनतेच्या प्रश्नांवरील चर्चा सत्ताधाऱ्यांनी टाळली : नाना पटोले

## गॅस दरवाढ, महागाई, शेतकरी प्रश्नांवर सरकारविरोधात घोषणाबाजी

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** खा. संजय राऊत यांनी विधान मंडळाबाबत केलेले वक्तव्य निषेधार्ह आहे, त्याचे समर्थन होऊ शकत नाही. विधीमंडळाचा अपमान करण्याचा अधिकार कोणालाच नाही, तो राज्याच्या जनतेचाही अपमान आहे. भाजपाने त्यासंदर्भात हक्कभंग ठराव आणला होता. सभागृहात कोणाचाही विरोध नव्हता. अध्यक्षांनी यावर तातडीने निर्णय द्यावा व जनतेचे प्रश्नही महत्वाचे आहेत त्यावर चर्चा व्हायला हवा होती पण जनतेच्या प्रश्नावर चर्चा होऊ नये म्हणून सत्तापक्षाकडून ठरवून सभागृह बंद पाडण्यात आले, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले म्हणाले. विधानभवन परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, महागाई वाढलेली आहे, गॅस सिलेंडरचे दरही वाढले आहेत, महागाई, दरवाढ करुन सरकार जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करत आहे. शेतकऱ्यांना वीज मिळत नाही, कृषीपंपाचे वीज कनेक्शन कापले जात आहे. या सर्व मुद्द्यांवर सभागृहात चर्चा व्हावी अशी विरोधी पक्षांची भूमिका होती. जनतेचे हे महत्वाचे प्रश्न असून त्यावर सभागृहात चर्चा झाली पाहिजे होती पण सत्ताधाऱ्यांनी ती होऊ दिली नाही. जनतेच्या प्रश्नाला उत्तर द्यावे लागेल म्हणून रणनिती ठरवून सत्ताधारी पक्षाने आज कामकाज होऊ दिले नाही. विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या आजच्या तिसऱ्या दिवशी विरोधी पक्षांनी विधानभवनच्या पायऱ्यांवर जोरदार आंदोलन केले. घरगुती गॅसचे दर कमी करा, शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज द्या, नाहीतर खूर्च्या खाली करा. देशद्रोदी सरकारचा धिक्कार असो, शेतकऱ्यांची वीज तोडणी बंद करा, अशा घोषणा देण्यात आल्या.

# सिसोदिया यांना दिलासा नाहीच

आधुनिक केसरी

आर्थिक घोटाळ्यात अटक झालेले आप नेते मनीष सिसोदिया यांनी दिल्लीच्या उपमुख्यमंत्रीपदाचा मंगळवारी राजीनामा दिला. कथित मद्यविक्री घोटाळ्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलासा न दिल्यामुळे सिसोदियांची सीबीआय कोठडी कायम राहिली आहे. या पार्श्वभूमीवर सिसोदिया आणि सत्येंद्र जैन यांचे राजीनामे मुख्यमंत्री अरिवद केजरीवाल यांना स्वीकारावे लागले. सिसोदियांच्या अटकेमुळे केजरीवाल यांना अन्य राज्यांचे दौरे रद्द करून तातडीने दिल्लीत परतावे लागले. दिल्लीतील सरकारमधील ३३ पैकी १८ खाती सिसोदिया सांभाळत होते. अर्थ, आरोग्य, शिक्षण अशी महत्त्वाची मंत्रालये त्यांच्याकडे होती. या सर्व खात्यांची जबाबदारी अन्य नेत्यांकडे द्यावी लागणार असल्याने केजरीवाल यांना लवकरच मंत्रिमंडळाची फेररचना करावी लागेल. शिवाय, यंदाचा अर्थसंकल्प सादर करावा लागणार आहे. सिसोदियांच्या अनुपस्थित ही जबाबदारीही अन्य मंत्र्याकडे सुपूर्द करावी लागेल. गेल्या वर्षी मे महिन्यांपासून सत्येंद्र जैन तिहार तुरुंगात असूनही केजरीवाल यांनी त्यांच्याकडील आरोग्य मंत्रीपद काढून घेतलेले नव्हते. सिसोदियांच्या अटकेनंतर मात्र भाजपने दोन्ही मंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी दबाव वाढवला. केजरीवाल यांनी दोघांचेही राजीनामे घेतल्याने नैतिक विजय झाल्याचे भाजपचे म्हणणे आहे. राजीनामा स्वीकारल्याचा अर्थ गुन्ह्यांची कबली नसल्याचा दावा 'आप'ने केला आहे. सिसोदिया व जैन यांचे राजीनामे नायब राज्यपालांकडे दिले जातील, त्यानंतर ते राष्ट्रपतींकडे स्वीकृतीसाठी पाठवले जातील. उत्पादन शुल्क धोरणात बदल करून मद्यविक्री पद्धतीतही बदल केले गेले. दक्षिणेतील मद्यविक्रेत्यांच्या दबावानंतर नफ्याचे प्रमाण ५ टक्क्यांवरून १४ टक्क्यांवर नेले. या बदलासाठी सिसोदियांसह 'आप'च्या नेत्यांनी लाच घेतल्याचा आरोप असून या प्रकरणी 'सीबीआय'ने सिसोदियांना रविवारी अटक केली होती. 'सीबीआय' विशेष न्यायालयाने सोमवारी सिसोदिया यांना ४ मार्चपर्यंत सीबीआय कोठडी दिली होती. त्याविरोधात सिसोदियांच्या वतीने मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली. मात्र, या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयात जाण्याचे आदेश सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड व न्या. पी. एस. नरसिंहा यांच्या पीठाने दिले. 'घटना दिल्लीमध्ये घडली आहे, एवढ्या कारणाने तुम्हाला सर्वोच्च न्यायालयात येण्याची गरज नाही. सिसोदियांसमोर विशेष न्यायालयासह दिल्ली उच्च न्यायालयात जाण्याचा पर्याय खुला आहे,' अशा शब्दांत न्यायालयाने फटकारल्यानंतर सिसोदियांचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी याचिका मागे घेतली.

# विज्ञानदिन साजरा करण्याचा अधिकार आहे ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**आपल्या देशात जन्मापासून तर मरेपर्यंत आपण अज्ञानला सोबत घेऊन जगतो व मरतो. अंधश्रद्धा, चमत्कार, पाखंड दैवशक्तीला सत्य समजून अंधश्रद्धा, पाखंड, चमत्कार व दैवशक्तीवर बोलणारा समाजामध्ये विज्ञानवादी ची पेरणी करणाऱ्या लोकांच्या हत्या केल्या जातात, पाखंड आणि अंधश्रद्धा पसरवून चमत्कार दाखवणाऱ्याला मात्र डोक्यावर घेऊन मिरवले जाते. पांखडी व चमत्काराचे ढोंग करण्याला शरण जातात त्यांना गुरु मानून त्यांचे गुणगान गायले जाते. अशा देशात विज्ञान दिन साजरा करणे म्हणजे जन्मजात आंधळ्या मानसाच्या हाती अंधाऱ्या रात्री दिवा दिवा देऊन त्याला रस्ताशोधायला लावण्यासारखे आहे.**

किमान देशातील लोकांना विज्ञान शब्दाचा अर्थ तरी माहिती आहे का ? अज्ञानाला सत्य समजून घेणाऱ्या लोकांच्या डोक्यात विज्ञान जाईल का ? जेथे विज्ञान आहे तेथे चमत्कार, पाखंड, अंधश्रद्धा भोंदु यांचा वावर राहण्याचा काहीही संबध नाही. परंतु विज्ञानाची ऐसीतैशी करून येथे विज्ञानविरोधी अंधश्रद्धा, पाखंड, चमत्कार दाखवून व या बाबींना धर्माशी जोडून लोकांना धर्मभोळे बनवले जाते. जेव्हा देशात विज्ञानवाद सांगितला जातो किंवा कोणी अंधविश्वास, पाखंड, चमत्कार, भोंदुगीरी वर बोलतो तेव्हा भऱ्याच लोकांना असे वाटतं हा धर्मविरोधी आहे, आमच्या धर्माच्या विरोधात आहे. काही लोकांना अंधश्रद्धा पाखंड चमत्कार दैवशक्ती यांच्या बद्दल तर्कशुद्ध व विज्ञानवादी ऐकणे सुद्धां पाप वाटते. मुळात नऊ दिवस अनवाणी पायाने फिरणारा आणि रस्त्यावर मांजर आडवी आल्यावर थांबणारा शिक्षक जर विज्ञान शिकवत असेल तर त्याचे विज्ञानाविषयीचे ज्ञान दिसुन येते. आणि अशा देशात विज्ञानाची रुजवण व्हावी म्हणजे नवलच. जेव्हा विज्ञान समजून घेतले जाते तेव्हा चमत्कार, पाखंड, अंधश्रद्धा चमत्कार हे सर्व नष्ट होते आणि मुळात भारतात यावरच तर सर्व सुरू आहे. पांखड, अंधश्रद्धा, चमत्कार आणि भोंदुगीरी वर कित्येक लोकांचे पोट आहेत. पैसा कमविण्याचे साधन आहेत म्हणून भारतात अंधश्रद्धा, पाखंड चमत्कार भोंदुगीरीला सांभाळून विज्ञान शिकवले जाते. म्हणून आपल्याला नैतिक दृष्टीने विज्ञानदिन साजरा करण्याचा अधिकार आहे का यावर विचार मंथन होणे गरजेचे आहे. जेथे अंधश्रद्धा, पाखंड, चमत्कार आणि भोंदुगीरी ला थेट धर्माशी जोडून लोकांना धर्मावर जास्त संवेदनशील बनवले जाते तेथे विज्ञान असेल म्हणजे खडकावर मत्सालय असल्यासाखरेच होय. आणि हि अंधश्रद्धा अडाणी, अशिक्षित किंवा विकासापासून दुर असलेल्या लोकांमध्येच आहे असे बिलकुल नाही. सुशिक्षित आणि पांढरपेशी लोकांमध्ये जास्त प्रमाणात आहे. आपण काही उदाहरणे धर्म घरात ठेऊन विज्ञानाच्या नजरेतून बघितले तर आपल्या लक्षात येईल आपण विज्ञानवादी आहोत की अज्ञानवादी आहेत. राफेल नावाचे विमान देशाची सुरक्षा करण्यासाठी आपला देश विकत घेतो. राफेल विकत घेतल्यामुळे सैन्यांना खूप मोठा आधार मिळतो. देशाची सुरक्षा व्यवस्था अत्याधुनिक होत आहे याचा आनंद आणि आमच्या बरोबर आमचा देश व आमचे सैन्य ही सुरक्षित राहील म्हणून राफेल नामक विमानाचे स्वागत प्रत्येक भारतीयांनी केले. थोडक्यात काय तर राफेल मुळे देशाची सुरक्षा मजबूत झाली. परंतु आम्ही एवढे विद्वान आहोत की देशाची सुरक्षा करण्यासाठी लाखो करोडो रुपये खर्च करून विमान विकत घेतो आणि विमानाची सुरक्षा व्हावी म्हणून त्याला लिंबुमीरची बांधतो येथेत तर आम्ही विज्ञानाचा खुन करतो. एकतर हवेत उडणारे, हवेत उडून ओझे वाहणारे अनेक पात्र देशाकडे असताना आपल्याला विमानाचा शोध का लागला नसेल ? हवेत उडणाऱ्या पात्रांना आम्ही सत्य समजतो तर मग त्यावर चिकित्सा आणि संशोधन करून विमानाचा शोध भारतात लागणे आवश्यक होता. परंतु तसे झाले नाही. शिक्षण प्रयोगशाळा बंद करून मंदीरावर खर्च करणारे सरकार नेमके कोणत्या पद्धतीचे विज्ञान शिकवणार आहे ? त्यातही दुसरी गोष्ट विज्ञानाच्या चिथड्या उडवून मानसाच्या जाती तयार करून माणसाला कमी जास्त व हिन लेखून समाजव्यवस्था निर्माण केली जाते. आणि या समाजव्यवस्थेमध्ये खालच्या जातीच्या लोकांचा स्पर्श झाला तरी वरच्या जातीतील माणुस बाटतो अपवित्र होतो. त्याला पवित्र करण्यासाठी गोमुत्राचा वापर करावा लागतो हे आमचे विज्ञान ? धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धा बाळगु नका असे बोलणाऱ्याला गोळ्या झाडून ठार मारले जाते आणि शेतातील आंबे खाल्ले तर मुलागा होता असे बोलणाऱ्यला संरक्षण देऊन मोठे केले जाते. आणि आंब्याने मुल होतात असे बोलणाऱ्याला विज्ञानविषयात पदवीधर आहे असेही सांगितले जाते. दुख दुर करण्यासाठी होम हवन व नवस केल्या जातात. नवस केल्याने अनेकांना धनप्राप्ती, पुत्रप्राप्ती होते मग मेहनत करण्याची गरजच काय ? अंधश्रद्धा पांखड चमत्कार ह्या गोष्टी धर्माशी जोडल्या तर जोडा काही अडचण नाही परंतु देशाच्या सभागृहात आणि शासकीय कार्यालयात सत्यनारायण होतो. याचा संबंध विज्ञानाशी कसा जोडायचा ? आकाश गंगेतील ग्रह गुरु शनी तेथून येथे यांच्या जिवनात येऊन अडथळे निर्माण करतात आणि आमचे शास्त्रज्ञ हजार पाचशे घेऊन होम हवन, पुजा अर्चा करून गुरू शनी जे काही ग्रहाची अडचण होती ती दुर करतात. काही काही एवढे विद्वान शास्त्रज्ञ आहेत की त्यांनी वैद्यकीय शास्त्राला सुद्धां आवाहन दिले आहे. मंत्रोच्चार करून दुखाचे निवारण करतात, मंत्रोच्चार करून अस्तीत्वात नसलेले भुत मंत्राने दुर करतात. पोटात दुखत असताना डोक्याला राख लाऊन पोटदुखी थांबवणारे अनेक विद्वान देशात आहेत. आणि सरकार ही अशा लोकांना प्रोत्साहन देते. चमत्कार आणि दैवशक्ती दाखवणारे एवढे वैज्ञानिक आहेत की जगातील वैज्ञानिक एकीकडे आणि आपले चमत्कारिक वैज्ञानिक एकिकडे ठेवले तर संख्येने सारखेच असतील परंतु जागतिक वैज्ञानिक विज्ञानाचा फायदा जगाला प्रगत व ज्ञानी करण्यासाठी करतात आणि आमचे वैज्ञानिक लोकांना अंधश्रद्धेत ढकलून स्वतः साठी पैसा कमवतात. लोकांच्या मनातील ओळखणारे अनेक भोंदु देशात पोसले जातात. लोकांच्या समस्या व उपाय सांगुन करोडोची माया जमा करतात काही लोक त्यांच्या समोरही मरतात पण त्यावर बोलले की पाप लागते म्हणून तस काही बोलायचे नसते. लाखों लोकांच्या मनातील ओळखणारे अनेक भोंदुलोक आहेत लोकांचा त्यावर विश्वास आहे तर मग ते सैन्यावर हल्ला होतो, पुलवामा मध्ये आरडीएक्स ने आमचे सैन्य उडवले जाते या विषयी माहिती का देत नसतील ? शेतकरी शेतीमध्ये काम करून उत्पन्न घेतो तेव्हा दुष्काळ पडणार आहे, भाव मिळणार नाही म्हणून तुम्ही यावर खर्च न करता दुसऱ्या पिकावर खर्च करा असे का बर हे शेतकऱ्यांना सांगत नसतील. कमीत कमी त्याचा फायदा शेतकऱ्यांना तर होऊ द्या. या देशात तर पाण्याचे पेट्रोल करणारे लोक आहेत. स्टेजवर पाण्याचे पेट्रोल बनवले जात होते आता ते जेल मध्ये आहेत तो भाग वेगळा पण पाण्याचे पेट्रोल बनवण्याची कला असणाऱ्यांनी समुद्रातील पाण्याचे पेट्रोल बनवले असते जगाला सर्वात स्वस्त पेट्रोल मिळाले असते आणि देशाचा मान जगात उंचवली गेली असती. महिलांचे लफडे कोणासोबत आहेत हे सांगणारे वैज्ञानिक आपल्याकडे आहेत परंतु देशातील हजारो करोडो रुपयांचे घोटाळे केलेल्या लोकांची नावे त्यांनी पैसे कुठे ठेवले याबद्दल यांना माहीती नसते यात नवलच. शाळेची डागडुजी करण्यासाठी, कोणाला नवीन प्रयोग करण्यासाठी पैसा नसलेले सरकार कुंभमेळा यावर करोडो रुपये खर्च करून आपला वैज्ञानिक दृष्टिकोन जगाला दाखवून देतो. डोळे बंद करून समोरचे पाहण्याची कला आपल्या कडे असली तरी टीव्ही चा शोध मात्र आम्हाला लावता आला नाही. पर्वत उचलून नेणारे आमच्या कडे असताना आम्हाला क्रेनचा शोध लावता आला नाही, सर्व काही आम्हाला दिसते असे म्हणणाऱ्या देशात ड्रोण व सिसि टिव्ही कँमेराचा शोध लागला नाही. याचे मुख्य कारण आहे होम हवन ,चमत्कार,पाखंड अंधश्रद्धा आणि भोंदुगीरी जपताना विज्ञानाची पायमल्ली होत असताना धन्यता माणणारे आपण. देव आणि देवाची शक्ती याविषयी प्रचंड अंधश्रद्धा निर्माण करून ठेवली आहे, देव किंवा त्यांच्या शक्तीबद्दल अस्तीत्वाबद्दल कोणी प्रश्न उपप्रश्न विचारले तर बरेच लोक सामाजिक आणि अश्लील शिवीगाळ देव नावासाठी करतात. परंतु तर्कशुद्ध व विज्ञानवादी चर्चा करत नाहीत. देव म्हणजे सर्वस्व समजून देवावर विश्वास ठेवायचा म्हणजे मेंदुचा वापर बंद करून राहणाऱ्यांची संख्या कमी नाही आणि तेही विज्ञान दिन साजरा करतात. आई वडिलांना जिवंतपणी मानसन्मान व योग्य आहार द्यायचा नाही परंतू मेल्यानंतर पितरांच्या नावाखाली पंचपक्वान्न आईवडिलांना पाठवायचे ही शक्ती फक्त आपल्या कडे आहे अशा बऱ्याच गोष्टी आहेत ज्यावर बोलले तर भावना दुखतात परंतु न बोलले तर विज्ञानाची ऐसीतैशी होते, आणि विज्ञानाची ऐसीतैशी करून विज्ञानदिन साजरा केला जातो तर तो अधिकार आम्हाला आहे ?




# भारत बनणार आर्थिक महासत्ता



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**विकसीत जगतावर सध्या रशिया-युक्रेन युद्धाचा मोठा परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे या विकसीत राष्ट्रांवर मंदीचे सावट असून अनेक देशात महागाईने उच्चांक मोडीत काढले आहेत. अशा काळातहीभारतीय अर्थव्यवस्था मात्र गतीने पुढे सरकत आहे. अलीकडच्या काळात भारताची आर्थिक वाढ झपाट्याने झाली आहे. भारताची दरडोई वाढ चीनच्या तुलनेत केवळ एक चतुर्थांश आहे. मात्र योग्य धोरणांमुळे भारताचा विकास दर भविष्यात ७ टक्क्यांच्या वर असू शकतो. भारताची अर्थव्यवस्था चीनच्या तुलनेत खूप वेगाने वाढेल.**

यामुळे आगामी काळात भारत एक मजबूत आर्थिक शक्ती म्हणून उदयास येईल. रुपयाच्या आंतरराष्ट्रीय स्वीकृतीची व्याप्ती वाढून, आर्थिक स्थिरतेचा आधारही वाढेल. जागतिक पातळीवर भारतीय रुपया कालांतराने प्रमुख चलनांपैकी एक बनू शकेल. म्हणजे येत्या काही काळात जगभरात भारतीय रुपया खणखणणार आहे. एकूणच कालांतराने डी-डॉलरायझेशनची प्रक्रिया होईल. भारत एक मोठा देश आहे आणि देशातील बहुतांश लोकसंख्या तरुण आहे. उत्तम शिक्षण आणि कौशल्य असलेले येथील तरुण भारताला एका मजबूत विकासाकडे नेऊ शकतात. अनेक आव्हानाचा सामना करत असताना भारत महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे. खरं तर भारत ही जगातील सहावी मोठी अर्थव्यवस्था आहे. लष्करी सामर्थ्यात हा चौथ्या क्रमांकाचा शक्तिशाली देश आहे. भारतीय लष्करी क्षेत्रात झपाट्याने आधुनिकीकरण होत आहे, ज्यामुळे केवळ संरक्षण उपकरणांच्या निर्मितीतच वाढ होत नाही, तर परकीय गुंतवणूकही वाढते. आज भारताचे सैन्य कोणत्याही शक्तीला आव्हान देण्यास सक्षम आहे. भारत हा जगातील सर्वात मोठी युवा शक्ती असलेला देश आहे, जो विकासाला वेगाने पुढे नेण्यास सक्षम आहे. अचूक आणि प्रभावी मुत्सद्देगिरीचा परिणाम म्हणून जागतिक स्तरावर भारताचे स्थान सातत्याने मजबूत होत आहे. जगात चौथ्या क्रमांकावर उभा असलेला भारत अवकाश क्षेत्रात आपली ताकद दाखवत आहे. येत्या काळात तोच देश वेगाने महासत्ता बनणार आहे, ज्याकडे आधुनिक तंत्रज्ञान असेल. तंत्रज्ञानात गुंतवणूक केल्याशिवाय कोणताही देश महासत्ता होण्याचा विचारही करू शकत नाही. इस्रोने रॉकेटद्वारे १०४ उपग्रह अवकाशात पाठवून जगाचे लक्ष वेधून घेतले होते, हा भारताच्या तंत्रज्ञानाचा चमत्कार होता. आज इस्रो जगातील सर्वात स्वस्त उपग्रह बनवण्यासाठी ओळखली जाते. केवळ विकसनशीलच नाही तर विकसित देशही आपले उपग्रह अवकाशात पाठवण्यासाठी इस्रोसोबत करार करण्यास उत्सुक आहेत. २०२४ मध्ये भारत गगन यान या स्वदेशी बनावटीच्या अवकाश यानाद्वारे भारतीय अंतराळवीरांना अंतराळात पाठविणार आहे. पायाभूत सुविधांचा झपाट्याने होत असलेला विस्तार आणि प्रशिक्षित कामगारांची वाढती संख्या यामुळे भारताला उत्पादन केंद्र बनता आले आहे. भारताचा वाढता आर्थिक विकास दरही जगाचे लक्ष वेधून घेत आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीत विदेशी गुंतवणुकीचा वेग वाढत आहे. वर्ष २०२१-२०२२ मध्ये ८४ सहस्र ८३५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची थेट विदेशी गुंतवणूक (एफ्.डी.आय.) भारतात झाली आहे. व्यवसायाच्या दृष्टीने भारतात योग्य प्रदेश आणि व्यवसायाला साहाय्यभूत ठरणारे सरकारचे धोरण यांमुळे देशात व्यवसाय करणे सोपे झाले आहे. वसुलीला उत्तेजन देणा-या योजना आणि विदेशी गुंतवणुकीला चालना देणारे उपक्रम यांमुळे गुंतवणूकदारांचा भारताविषयीचा विश्वास वाढला आहे. उत्पादनापासून ते माहिती तंत्रज्ञानापर्यंत, रासायनिक उद्योगापासून इलेक्ट्रॉनिक्स उद्योगापर्यंत, कृषी क्षेत्रापासून ते सेवा क्षेत्रापर्यंत भारत जगाच्या नकाशावर आपले अस्तित्व निर्माण करीत आहे. न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीच्या स्टर्न स्कूल ऑफ बिझनेसचे प्रोफेसर नुरिएल रुबीनी या सुप्रसिद्ध अर्थतज्ञांनी भारताबाबत ही भविष्यवाणी केली आहे. नुरिएल रुबिनी यांनी यापूर्वी २००८ मध्ये जागतिक आर्थिक मंदीचा अचूक अंदाज वर्तवला होता. या मंदीनंतर जगभरातील शेअर बाजार कोसळले होते. यात मोठ्या प्रमाणात नोकऱ्यांचे नुकसान झाले. तेव्हापासून नुरिएल रुबिनीला "डॉ. डूम म्हणून ओळखण्यास सुरुवात झाली. त्यांचा अर्थशास्त्रातील अभ्यास व्यापक असून, ते भविष्यातील अर्थव्यवस्थेचा अचूक अंदाज मांडतात. युरोपीय देश आणि भारताची तुलना करायची झाल्यास भारताची लोकसंख्या आणि चांगला जीडीपी याबाबतीत युरोपीय देश भारताची प्रगती नाकारू शकत नाहीत. भारतातील लोकसंख्येचा विचार करता ३५ वर्षाखालील सर्वाधिक लोकांचा समावेश अतिकार्यक्षम गटात होतो.

या तरुणांना जागतिक दर्जाचे शिक्षण व त्यांच्या हाताला मिळणारे काम हीच बाब भारताला महासत्ता होण्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. अर्थव्यवस्थेच्या वाढीमधील अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे, देशात उद्योग वाढीसाठी अनुकुल वातावरण ठेवले पाहिजे. सरकारी यंत्रणांमध्ये आवश्यक ते बदल केले पाहिजेत. यात जीडीपीत आणखीन स्थैर्य आणण्यासाठी भारताला आणखीन काही वर्षे काम करावे लागेल. यासाठी आर्थिक नियंत्रण आणि योग्य नीती राबवण्याची गरज आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वणव्याने होत आहे सातपुड्याची 'होळी'

## अवैध डिंक काढणाऱ्यांचा आगी लावण्याचा सपाटा : 2 आरोपी ताब्यात तर एक कोर्टासमोर

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** तालुक्यातील जळगाव जामोद वन विभाग अंतर्गत उंबरदेव ते कुवरदेव ह्या अतिशय महत्त्वाच्या व आंबाबरवा वन्यजीव अभयारण्य ह्या व्याघ्र बहुल जंगलाच्या शेजारी असलेला सातपुडा ची वने सध्या वनव्यांनी धगधगत असून वनसंपत्तीची व वन्यजीवांची हानी होत आहे. याविषयी अधिक माहिती मिळवली असता कुवरदेव परिसरातील सागवान बहुल परिसरात १८ फेब्रुवारी पासून लागलेली आग २८ फेब्रुवारी पर्यंत सतत धगधगत होती . तसेच जिल्ह्यातील उंच शिखरांपैकी एक असलेले ढोरमाऱ्या च्या मागच्या बाजूला भिंगारा पश्चिम बीटमध्ये दिनांक २७ मार्चला ला संध्याकाळ पासून वनवा धगधगत होता, या वनव्यांमुळे अमूल्य असा वनसंपत्ती व वन्यजीवांचा ठेवा नष्ट होत आहे त्याचप्रमाणे प्रकृतीला नुकसान होऊन प्रदूषण ही वाढत आहे. वनविभागाच्या दुर्लक्ष व वाढत्या मानवी हस्तक्षेपामुळे सदर वनवे लागल्याचे तालुक्यातील चित्र आहे. ह्या विषयी वनविभागाशी संपर्क साधला असता बऱ्याचदा ही आग आमच्या कार्यक्षेत्रात नसल्याचे उत्तर मिळाले तर काही वेळा आम्ही विझवत असल्याचा माहिती प्रभारी वनक्षेत्र अधिकारी यांनी फोनवरून दिली. त्याचप्रमाणे मागील आठवड्यापासून दररोज रात्री तालुका भरातून सातपुड्याच्या विविध भागांमध्ये आगी दिसत असल्याच्या दृश्य दिसते.



गुन्हे पूर्णत : रोखण्यासाठी पूर्णवेळ वनक्षेत्र अधिकारी असन्याची गरज आहे सोबतच विभागातील रिक्त पदे भरण्याची जळगाव जामोद वन कार्यालयाला गरज आहे . जळगाव जामोद तालुक्यातील वनहद्दीमध्ये सध्या सर्वच वनगुन्हे थोड्याफार प्रमाणात चोरीछुपे सुरू असून यामध्ये प्रामुख्याने गौण खनिज चोरी व अवैध गौण खनिज वाहतूक, अंजनपाला तस्करी, सागवान कटाई, अवैध सागवान चोप वाहतूक, तालुका भर हिरवे कडूनिंब, बाभूळ व चिंच वृक्ष कटाई करून वाहतूक, जंगलास आगी लावणे, अवैध चराई, काही ठिकाणी अतिक्रमणे व असे अनेक वनगुन्हे रोखणे हे वनविभागासमोरील मोठे आव्हान उभे ठाकले आहे . तालुक्यातील वनांचा विस्तार बघता इथं पूर्णवेळ अधिकाऱ्याची व पुरेशा कर्मचाऱ्यांची गरज आहे .तर सध्या खामगाव येथून प्रभारी अधिकारी हा कारभार पाहत आहे तसेच कर्मचाऱ्यांची संख्या ही तुटपुंजि ठरत असून त्यामुळे तालुक्यातील पर्यावरण धोक्यात आले आहे .

लागणाऱ्या आगी या फेब्रुवारी महिन्यापासून दरवर्षी लागत असून आता याचे प्रमाण जास्तच वाढले आहे या वनव्यांच्या आणखी मुळाशी जाऊन माहिती काढली असता ह्या आगी काही गुन्हेगार डिंक काढण्यासाठी लावत असल्याचे उघडकीस येत आहे . सालाई व इतर काही वृक्षांना बुडाशी कुऱ्हाडीचे घाव मारून त्या परिसराला आग लावल्या जाते . त्यामुळे त्या घावातून डिंक निघतो असा त्या गुन्हेगारांचा समज आहे . याच पद्धतीने परिसरातील कड व धावडा अशी गोंद उत्पादनासाठी महत्त्वाची झाडे या गुन्हेगारांनी नष्ट केल्याचे वृद्ध मंडळी सांगतात . ह्या प्रकरणी दोन आरोपींना वन विभागाने ताब्यात घेतले असल्याचे माहिती मिळाली . तसेच हा अवैध गोंद विकत घेणारा एक व्यापारी सुद्धा वन विभागाने कोर्टासमोर उभा केला असल्याचे कळते . ह्या अवैध डिंकाला सध्या 90 रु प्रति किलो हा भाव हे अवैध व्यापारी देत असल्याचे कळते . डिंकाचा हा धंदा न थांबल्यास, अशाच पद्धतीने जंगलांना आगी लावून वनसंपत्ती नष्ट करणे सुरू राहिले तर मुक्ताईनगर, यावल व आंबाबरवा ह्या प्रमुख जंगलांना जोडणारा हा सातपुड्याचा उंबरदेव ते कुवरदेव जोडमार्ग मधील जंगल नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही एवढे मात्र खरे . . . !

# कांद्याच्या अल्प दराने आणले शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी

## ५ ते ६ रुपये किलो कांदा: खर्चही निघेना

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सध्या नवीन कांदा बाजारात आलेला आहे. कांद्याची आवक वाढल्याने दर मोठ्या प्रमाणावर घसरले आहेत. कांद्याला प्रतिकिलो अवघा ५ ते ६रुपये भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चन निघणेही अवघड झाले आहे. कांद्याला मिळत असलेल्या अल्प दरामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले आहे.

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा परिसरात अनेक शेतकरी कांदा व इतर भाजीपालावर्गीय पीके घेत आहेत.लाल कांद्याचे उत्पादन यंदा चांगलेच वाढले आहे. बाजारात कांद्याची आवक वाढल्याने त्याचा परिणाम दरावर झाला आहे. एकीकडे कांदा उत्पादन वाढलेले असताना दुसरीकडे सध्याच्या बाजारभावातून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च फिटणे देखील दुरापास्त झाले असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. व्यापाऱ्यांकडून कांद्याची खरेदी अल्पदराने केली जात असल्याने शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग झाला आहे.अल्प दरामुळे शेतकरीवर्गात तीव्र नाराजी व्यक्त केली. जात आहे.परंतु आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मातीमोल भावात कांदा विक्री करावा लागत आहे.



### कांदा उत्पादकांचे आर्थिक नियोजन बिघडले

शेतकऱ्यांनी महागड्या दराने कांद्याची रोपे घेऊन कांद्याची लागवड पूर्ण केली आहे . यंदा कांदा लागवडीला मजूर वर्गाची देखील तुटवडा भासल्याने कांदा लागवडीचा दर प्रतिएकर १५ ते १७ हजार रुपयांच्या पुढे गेला होता . दरम्यान, कांदा लागवड झाल्यापासून प्रत्येक महिन्याला वातावरणात बदल झाल्याने कांदा पिकाला फटका बसला आहे . सातत्याने वेगवेगळ्या प्रकारच्या आणि महागड्या दराने कांद्यावर औषधाची फवारणी करून कांदे जगविले आहेत ; परंतु योग्य भाव मिळत नसल्याने कांदा उत्पादकांचे आर्थिक नियोजन बिघडले आहे . **बालु आप्पा गोंडबे, शेतकरी सावळदबारा**




# नाथषष्ठी सोहळ्यास पंधरा लाख वारकरी येतील

## पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या उपस्थितीत नियोजन बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** येथील नाथ महाराज षष्ठी सोहळ्यासाठी जवळपास पधरा लाखाच्या वर वारकरी येण्याचा प्रशासनाचा अंदाज असुन यासाठी पैठण शहरात

पालकमंत्री भुमरे यांच्या उपस्थितीत नियोजन बैठक घेण्यात आली. १३ ते १५ मार्च मधे होणाऱ्या षष्ठी सोहळ्यात वारकऱ्यांना सुविधा देण्यात याव्या अशा सूचना प्रशासनाला करण्यात आल्या. नाथषष्ठीचा उत्सव आकरा दिवसावर असल्याने नगर परिषद व संबधीत प्रशासनाने उपाययोजनांचा वेग आणखी वाढवावा, या कामी फक्त वारकरी, भाविकांना नजरेसमोर ठेवून जास्तीत जास्त सोयी सूविधा देण्याचा प्रयत्न यंत्रणांनी समन्वयातून ठेवावा. यात हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, आशा कडक सूचना अप्पर जिल्हाधिकारी अनंत गव्हाणे यांनी दिल्या. बुधवार १ मार्च रोजी नाथ संस्थानच्या सभागृहात नाथ षष्ठीची पूर्वतयारीचा त्यांनी दोन तास आढावा घेतला. यात्रा काळात अरोग्य, साफसफाई , पिण्याचे पाणी, राहण्याची तातत्पूरती व्यवस्था, जागावाटप, विद्यूत व्यवस्था, मोबाईल टॉयलेट व्यवस्था, शहरातील रस्ते सापसफाई आदी कामांना यूद्दपातळीवर प्राधान्य प्रशासनाने प्राधान्य द्यावे असे मूख्याधिकारी संतोष आगळे यांना स्पष्ट सांगितले. यात यात्रा काळात उघड्यावरील मास बंदी, गुड मॉर्निंग पथक, लोडशेडिंग, बस सुविधा, दारू बंदी, पोलीस बदोबस्त याबाबतीत संबधित अधिकारी वर्गाने जबाबदारीने यात योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले. त्यांनंतर संबधित अधिकाऱ्यांनी यात्रा मैदान, दर्शन रांग, वाळवंट, मंदिर मूख्य मार्ग आदी ठीकाणी पहाणी करूण पूर्वतयारी व सूरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. यावेळी उपविभागीय अधिकारी स्वप्नील मोरे, तहसीलदार लाड, मुख्याधिकारी संतोष आगळे, पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल, पोलिस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, नंदलाल काळे, नाथवंशज रावसाहेब महाराज गोसावी, रघुनाथ बुवा पालखीवाले, विस्वस्त बाजीराव बारे, पालकमंत्री यांचे स्विय सहाय्यक, गणेश मडके, नामदेव खरादसह विविध खात्याचे अधिकारी उपस्थिती होती.

यावेळी शहरातील नागरिकांनी वारकऱ्याना जास्तीत जास्त सोई सुविधा देण्यात याव्या अशा मागण्याही केल्या त्यात पैठण शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहीया यांनी शहरात तसेच यात्रा भरते त्या प्रमुख रोड वरील धुळ साप करुन यात्रा काळात रोडवर पाणी मारावे जेने करून वारकर्यांना धुळीचा त्रास होणार नाही अशी सुचना केली . नागरिकांच्या प्रश्नाला उत्तर देत संभाजीनगरचे पालकमंत्री संदीपान भुमरे यांनी वारकऱ्यांना यात्रा काळात सर्व सोई सुविधा पुरवण्यात येतील असे सांगितले .

महाराष्ट्र Business Katta












# मराठी भाषेचा पुळका...चिंता आणि चिंतन

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : ७

चार दिवसापूर्वी महाराष्ट्रात सगळीकडे मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. अनेक ठिकाणी एक दिवस का होईना मराठी भाषेचा जागर होतोय याचा आनंद वाटला. याच दिवशी माझ्यासारख्या मराठी भाषेचा पुळका असणाऱ्या माणसाला मराठी भाषा दिनाच्या दोन कार्यक्रमाचे निमंत्रण होते. झरीचे निमंत्रण पाच सहा दिवसापूर्वी असल्याने तिकडे निघालो. बसमध्ये असतानाच आमचे मित्र नाट्यकलावंत सतीश खरात यांचा फोन आला..म्हणाले, "सर आपण कुठे आहात ?" मी म्हणालो, "मी बसमध्ये आहे, झरीला जातोय..!" सतीशराव म्हणाले, कोर्टात मराठी भाषा दिन साजरा करण्यासाठी एक वकील साहेब मराठीवर भाषण करणारा भारीचा माणूस शोधताहेत. सतीशराव म्हणाले, मला हसू आले. वाटलं मंठ्यात ऐनवेळी मराठी भाषेवर बोलणारा भारीचा माणूस कोण भेटेल बुवा..? सर, मला मराठी भाषेवर बोलणारा माणूस तुमच्याशिवाय कुणी आठवत नव्हता म्हणून मी वकील साहेबांना तुमचे नाव सांगून तुमचा फोनही त्यांना दिला आणि हेही सांगितलंय की, तुम्ही झरीच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जात आहात ." असं बोलून सतीशरावांनी फोन ठेवला.

लोक एवढे व्यस्त आहेत की, ऐनवेळी कार्यक्रमाच्या दिवशी गावातल्याच पाव्हण्याचा शोध घेतात. त्यातही त्यांना पट्टीचा वक्ता पाहिजे असतो. ग्रामीण भाषेत सांगावयाचे झाल्यास "तहान लागली की, लोक विहीर खोदायला सुरुवात करतात." मराठी भाषेबद्दल कोरडा पुळका आणि ही एवढी औपचारिकता कशासाठी असेल ? मला प्रश्न पडतो. एक दिवस अगोदर आमच्या मित्राचा फोन... "उद्या शाळेत मराठी भाषा दिनाचा कार्यक्रम ठेवला आहे, कार्यक्रमासाठी तुम्हाला यावे लागेल !" मी झरीच्या कार्यक्रमात पाव्हणा असल्याचे त्यांना सांगितले.. त्यांनी तुळतुळ व्यक्त केली..आणि मराठी भाषा दिनावर बोलणाऱ्या कोणत्या पाव्हण्याला बोलवावे असे ते मलाच विचारत होते. मीही एक दोन नावे सांगितली आणि बरं ठेवतो म्हणून फोन ठेवला. मी विचार करू लागलो की, मराठी भाषेवर महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला बोलता यावे. आपण मराठीला आपली मातृभाषा म्हणतो आणि मराठीवर बोलणारा माणूस शोधत बसतो.. केवढी मोठी शोकांतिका आहे ही. मराठी भाषेचा दिवस साजरा करण्यासाठी सरकारने आदेश काढणे व सर्व शासकीय, प्रशासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्याला औपचारिकता म्हणून घेणे ही बाब मनाला खजील करणारी आहे. "मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा" ही मागणी कित्येक वर्षापासून केली जात आहे. जे अशी मागणी करतात त्यांचीच मुले इंग्रजी शाळेत म्हणजे कॉन्व्हेंटला शिकत असतात. बरं या महाराष्ट्रात कित्येक वर्षापासून मराठी भाषा बोलणारांचेच शासन आहे.. ते हिंदी किंवा इंग्रजी भाषिकांचे नाही..तरीही मागणी का पूर्ण होत नाही ?"

मराठी भाषा दिनाची सर्व वृत्तपत्रांना शुभेच्छा जाहिरात दिली जाते आणि मराठी भाषा दिवस सर्व कार्यालयात साजरा करावा, असा आदेशही काढला जातो. सदरहू आदेशानुसार औपचारिकताही पूर्ण केली जाते. संस्थापक असलेले आमचे प्रियमित्र पंडितराव प्रधान यांनी मला त्यांच्या झरी, ता.जि.परभणी येथील ज्ञानदीप विद्यालयात होणाऱ्या मराठी भाषा दिन व दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप अशा दुहेरी समारंभाच्या निमित्ताने निमंत्रित केले होते. मराठी भाषेविषयी विस्ताराने बोलण्याचा योग आला. मराठी भाषा लिहिताना वाचतांना आपण विरामचिन्हांचा, ऱ्हस्व, दीर्घ, ऊकार, वेलांटी यांचा विचार न करता शब्द किंवा वाक्य लिहितो आणि शब्दांच्या व अक्षरांच्या चुका करून बसतो. परिणामी त्यांचे अर्थ बदलत असतात. एखाद्या वाक्यात अनुस्वार, स्वल्पविराम,हे जिथे पाहिजे त्याच ठिकाणी जर आले नाही, तर वाक्याचा अर्थच बदलून जातो. हे मी विद्यार्थ्यांना सांगत होतो, उदाहरणे देत होतो. चुकांच्या गमतीजमती सांगत होते. उदाहरणार्थ.. "काल आमचा आंबा पडला. 'आ' वर अनुस्वार नसेल तर "काल आमचा आबा पडला' असे होईल. "मी पळत पळत जाऊन मामाच्या मांडीवर बसलो." आपण मांडीवर या शब्दातला अनुस्वार विसरलो की, माडीवर बसलो असा अर्थ होईल. म्हणजे एका अनुस्वाराने ठिकाणच बदलते. अनेक शब्दांचा उलगडा करून सांगतांना विद्यार्थी जीवाचे कान करून ऐकत होते. अधून मधून खूप हसत होते. मराठी भाषेत एकाच अर्थासाठी दोनचार शब्द येतात तसे इतर भाषेत येत नाहीत, मराठीची ही एक जमेची बाजू.

आम्हाला आमच्या मराठी भाषेचा खूप अभिमान आहे. आमच्या मराठी भाषेसारखी दुसरी कोणतीच भाषा श्रीमंत नाही असे गौरवाने आणि गर्वाने सांगतो आणि मराठी भाषा दिन लिहितांना आम्ही दीर्घ 'दीन' लिहून मोकळे होतो. एकीकडे आमच्या मराठी भाषेसारखी दुसरी श्रीमंत भाषा नाही आणि लिहितांना मात्र मराठी भाषा दीन ( मराठी भाषा गरीब ) असे लिहितो म्हणजे सांगतांना श्रीमंत सांगतो आणि लिहितांना मात्र गरीब लिहितो. म्हणजे आम्ही अशी भाषिक दिवाळखोरी जोपासत असतो.

मराठी भाषा लिहिताना तर आम्ही खूप चूका करतो... गोविंद लिहिण्याऐवजी गोंविद लिहितो म्हणजे गों वर अनुस्वार देतो. अंबिका लिहिण्याऐवजी





अबिंका लिहितो. काही लोक संदर्भ लिहिण्याऐवजी सदंर्भ लिहितात. एक लिहिण्याऐवजी 'ऐक' लिहितात. चुकीच्या अक्षराच्या डोक्यावर रफार देतात अशा अनेक चुका आम्ही करतो आणि मराठी भाषा जगली पाहिजे, वाचली पाहिजे म्हणून बोंबलत बसतो.

बोलतांना बरेचसे इंग्रजी शब्द बोलतो. उदा. 'काही प्रॉब्लेम नाही', जस्ट गेलो न् जस्ट आलो. 'मला त्यात इन्टरेस्ट नाही'. 'रॉंग नंबर है ठेवा.' 'रात्री नाईट केली'...रात्री म्हणतो नि नाईटही म्हणतो. 'रात्री नाईट ड्युटी होती.' 'मागच्या बॅक साईडला'. मागच्या आणि बॅक साईडला. 'एसटीत स्टॅंडींगमधी उभाच आलो.' स्टॅंडींगमधी आणि उभाच आलो आहे की,नाही गंमत ? नवीन पीढी तर प्रत्येक वाक्याची सुरुवात ॲक्च्युली या इंग्रजी शब्दाने करतात. खरंतर या शब्दाची काहीच गरज पडत नाही. उदा. "ॲक्च्युली मी येणारच होतो.' 'ॲक्च्युली काय आहे.... 'ॲक्च्युली काय झालं' अनेक वाक्यात ॲक्च्युली आणतो. ॲक्च्युल म्हणजे त्या ॲक्च्युलीची काहीच गरज नसते. तरीही ते प्रत्येक वाक्याच्या सुरुवातीला ॲक्च्युली बोलतातच...एवढेच नाहीतर अनेक इंग्रजी शब्दांचा भरणा मराठी वाक्यात असतो. मराठीची चिंता करायची की, तिच्याविषयी चिंतन करायचे असा माझ्या मनात नेहमीच एक पुळकाधारी गोंधळ निर्माण झालेला असतो. मराठी भाषेत येणारे अनेक शब्द त्या त्या सत्तेच्या शासनकाळात जसेच्या तसेच राहिले आहेत व ते मराठी होऊन बसले आहेत, अंगवळणी पडले आहेत. जसेकी- टेबल, पेन, रोड, हॉटेल, बस, पेपर, बॉंड, बॅंड, बॅंक, बसस्टॅंड, मोटर, हर्टफेल ( ग्रामीण शब्द हाटफेल ), शर्ट, नोटरी, फोटो, मोटरसायकल, पीन,टायपिंग, अशा इंग्रजी शब्दांनी तसेच बईनामा, तहसील, दवाखाना, ईनाम, करारनामा, सलुनामा अशा हिंदी, ऊर्दू शब्दांनी अजूनही आपली पाठ सोडलेली नाही. यासाठी मराठी भाषेतच सक्तीने शासकीय कामकाज झाले पाहिजे, असा आग्रह धरावा. अगोदर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून घेतला पाहिजे. ( दै.सकाळ, ता.२८, औ.बाद आवृत्ती महाराष्ट्र पेजवरील बातमी ) गेल्या २७ तारखेला एक निर्णय घेण्यात आला, "मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा या संदर्भात राज्याचे शिष्टमंडळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन त्यासाठी विनंती करेल अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मराठी भाषेने अभिजात भाषेचे चारही निकष पूर्ण केले आहेत. गेल्या चौदा वर्षापासून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा, यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा तातडीने देण्यात यावा यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विरोधी पक्षाच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन हा प्रश्न लवकरच मार्गी लावावा अशी मागणी रा.कॉं. चे आमदार छगन भुजबळ साहेब यांनी विधानसभेत केली. साहित्याची श्रेष्ठता, भाषेच्या वयाचे १५०० ते २ हजार वर्षाचे लिखित पुरावे, भाषेची स्वतंत्रता आणि भाषेचे मूळ स्वरूप व आजचे स्वरूप यांचे नाते असणे हे अभिजात भाषेचे चारही निकष मराठी भाषेने पूर्ण केलेले आहेत. मात्र अद्यापही मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्याचा प्रश्न रखडलेला असल्याची बाब मा.आ.भुजबळ साहेबांनी सभागृहात निदर्शनास आणून दिली आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने तयार केलेला अहवाल केंद्र सरकारने नेमलेल्या भाषा तज्ज्ञांनी सर्वानुमते मंजूर केला आहे. त्याला सात वर्षाहून अधिक काळ लोटला गेला असून कुठलाही निर्णय झालेला नाही. वास्तविक महाराष्ट्रातील "प्राकृत" किंवा "महारठ्ठी" या नावाने दोन अडीच हजार वर्षांपूर्वी प्रचलित, लोकप्रिय व मान्यताप्राप्त असलेली मराठी भाषा ही संस्कृतपेक्षाही जुनी असल्याचे म.म.राजारामशास्त्री भागवत यांनी १८८५ मध्येच दाखवून दिले आहे. यावर दुर्गा भागवत यांनी संशोधन करत विश्लेषण केले आहे, त्यात त्यांनी जुनी महाराष्ट्रीय भाषा संस्कृतपेक्षाही जुनी, खरी व जिवंत भाषा आहे हे त्यांनी दाखवून दिले आहे असे भुजबळ साहेबांनी यावेळी सांगितले. दक्षिणेकडील सात भाषांना आजवर अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. मराठी भाषेने देखील अभिजात भाषेचे निकष पूर्ण केले आहेत. या सर्वांचा पाठपुरावा हा अतिशय महत्त्वाचा असून यामुळे मराठी भाषेच्या जागतिक प्रतिष्ठेवर शिक्कामोर्तब होईल. तसेच देशातील ४५० विद्यापीठामध्ये ही भाषा शिकवली जाणार आहे. त्यामुळे तातडीने हा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी छगन भुजबळ साहेबांनी केली आहे. बघुया मराठीला किती लवकर न्याय मिळेल... की, स्टार्टअप इंडिया, डिजिटल इंडिया, सारखा " स्टार्टअप मराठी" असा एखादा शब्दच मराठी भाषेच्या पदरी पडू नये म्हणजे जिंकलो..!



**लेखक - सामाजिक, साहित्यिक व सांस्कृतिक चळवळीचे अभ्यासक आहेत.**

# मराठी भाषेला विसरु नका



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**मराठी भाषेचा गोडवा हा जगावेगळा असल्याचे जगजाहीर आहे. 27 फेब्रुवारी हा दिवस मराठी साहित्याचा मानदंड वि.वा.शिरवाडकर यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने "मराठी भाषा दिवस" म्हणुन साजरा केला जातो. या दिवसाला आगळे वेगळे महत्व असुन या दीवसाला जागतिक मराठी भाषा दिवस, मराठी भाषा गौरव दिन म्हणुनही साजरा केला जातो. मराठी भाषेतील अग्रगण्य व श्रेष्ठ आधुनिक मराठी कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समिक्षक विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्म 27 फेब्रुवारी 1912 रोजी पुणे येथे झाला.**

त्यांनी अनेक माध्यमांच्या सहाय्याने मराठी भाषेचा जगभर प्रसार करून मराठी भाषेचे नाव लौकीक केले व गौरान्वीत केले.त्यामुळेच जगातील मराठी भाषीक 27 फेब्रुवारीला जागतिक मराठी दिवस म्हणून साजरा करतात. मराठी भाषेचा गोडवा हा जगावेगळा आहे.

मराठी भाषा सोज्वळ आणि सोपी असल्याने कोणीही तीला सहज अवगत करू शकते. महाराष्ट्राची मातृभाषा ही भारतासह संपूर्ण जगाला वेगळाच आनंद प्रदान करीत असते.मराठी भाषेत महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास आहे.याची जोपासना करण्याचे दायित्व संपूर्ण मराठी भाषीकांवर आहे.मराठी मांनसाचे कर्तव्य बनते की मराठी भाषा जगातील मानसाच्या हृदयात व रक्तात कसे रूजवीता येईल याकडे सर्वांचे लक्ष असले पाहिजे. कारण ही मराठी भाषेची भुमी हिंदविस्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज,साधु-संत, थोर महात्मे, क्रांतीकारक, समाजसुधारक यांच्या संकल्पनेतून व संस्कारातुनच मराठीचा उगम झालेला आहे.मराठी भाषेला जिवीत ठेवण्याचे काम वि.वा.शिरवाडकर ( कुसुमाग्रज ) यांनी संपूर्ण ताकदीनिशी केले आणि जगभरात मराठीचा डंका वाजवीला.त्यामुळेच त्यांच्या जन्मदिनी म्हणजे 27 फेब्रुवारीला जागतिक मराठी भाषा दिवस म्हणुन साजरा केला जातो.या दिवसाला जगातील संपूर्ण मराठी भाषीक "मराठी भाषा गौरव दिवस" म्हणून साजरा करतात. आपल्या पुर्वजांनी मराठी भाषेचा गौरव वाढविण्यासाठी व मराठीचा ठेवा मजबूत करण्यासाठी संपूर्ण ताकद लावली.परंतु आताची नवीन पिढी मराठीचे मुळ शब्दच विसरल्याचे दिसून येते.आई-बाबा,काका-काकु,मामा-मामी, आजी-आजोबा या शब्दाचा विसरपडुन मम्मी-पप्पा,अन्टी, डॅडी,ग्रॅंडफादर-ग्रडमदर इत्यादी इंग्रजी शब्द मराठी भाषेत घर करतांना दिसत आहे. यामुळे मराठी भाषेतील अमृतवाणी नष्ट होवू शकते. याला नाकारता येत नाही.भारतात 28 राज्य 8 केंद्र शासीत प्रदेश आहेत. यामुळे भारताचा विचार केला तर 19500 हुन अधिक मातृभाषा आहेत. त्याचप्रमाणे इंग्रजी भाषेसह अनेक भाषा आहेत. त्या शिकाव्या व अवगत कराव्यात परंतु आपल्या मातृभाषेला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी मुख्यत्वेकरून आजच्या पिढीने घेतली पाहिजे. आपल्यासाठी मराठी भाषा ही गंगेसारखी निर्मळ व तुळशीच्या वृक्षासारखी पवित्र आणि वटवृक्षासारखी अफाट भाषा आहे.त्यामुळे मराठी भाषेचा जेवढा प्रचार करतात येईल तेवढा केलाच पाहिजे.मातृभाषा मराठी ही आईची भूमिका बजावीत असते तर राष्ट्रभाषा हिंदी ही वडीलांची भुमिका पार पाडते. भारतात 19500 पेक्षा अधिक मातृभाषा आहेत. परंतु या संपूर्ण भाषेमध्ये सोपी,सोज्वळ,मधुर आणि सहज अवगत होणारी एकमेव भाषा म्हणजे "मराठी भाषा"त्यामुळे आजच्या नविन पिढीला मी कळकळीची विनंती करतो की आपल्या मायबोली मराठीला न विसरता त्याची जोपासना केली पाहिजे. यातच महाराष्ट्राचा आणि मराठी भाषीकांचा गौरव आहे.महाराष्ट्र राजभाषा अधिनियम 1964 नुसार महाराष्ट्राची अधिकृत राजभाषा ही मराठी असेल असे घोषित झाले .त्यामुळे मराठी भाषा गौरव दिन दरवर्षी 27 फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे जेष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर ( कुसुमाग्रज ) यांच्या जन्मदिनी साजरा केला जातो. त्याचप्रमाणे मराठी भाषेला जीथे-जीथे रूजवीता येईल तीथे-तीथे रूजवुन मराठी भाषेला प्रज्वलीत करण्याचे काम आधुनिक युगात नवीन पिढीने केले पाहिजे.महाराष्ट्रातील कोणत्याही धर्माचा व्यक्ती असो किंवा पंथाचा व्यक्ती असो तो मराठीचा सन्मानच करतो.परंतु मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने मराठीला जगभरात कशी सुर्यासारखी तेजस्वी करता येईल याकडे संपूर्ण मराठी भाषीकांनी लक्ष दिले पाहिजे व मराठी भाषेचे नाव सुवर्ण अक्षरात कोरल्या गेले पाहिजे.याच मराठी भाषेने पोवाडा ,कीर्तन,भजन,भारूड,लावनीच्या माध्यमातून इंग्रजांना सळोकीपळो लावले व समाज जागृतीचे काम केले.आपण ज्या मातीत जन्म घेतला आणि ज्या भाषेच्या बळावर लहाण्याचे मोठे झालो.अशा मराठी भाषेचा प्रवास न थांबता संपूर्ण जगात झाला पाहिजे.तेव्हाच मराठी भाषेची मान आणखी उंचावेल व कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल असे मला वाटते.ज्या मातीत आपण जन्म घेतला तेथील भाषेची पुजाअर्चना व्हायलाच पाहिजे कारण ती आपणासर्वांसाठी पुज्यनीय आहे.आज दक्षिण भारतातील मातृभाषेचा विचार केला तर ती इतरांसाठी बोलायला व वाचायला अवघड व कठीण वाटते.त्यामुळे या भाषांचा प्रसार जास्त होवु शकला नाही.परंतु आज मराठी भाषा जगभरात ऐकायला व पहायला मिळते ही आनंदाची व गौरवास्पद बाब आहे.महाराष्ट्रातील मराठी भाषेचा विचार केला तर भारतातील काणा-कोपऱ्यातील व्यक्ती सहज अवगत करीत असतो.त्यामुळे देशातील इतर राज्यांतील लोक महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. यामुळेच मुंबईला देशाच्या आर्थिक राजधानीचा दर्जा मिळाला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे मराठी भाषा सोपी,सोज्वळ,निर्मळ आणि शांत स्वरूपाची आहे. या वैभवशाली महाराष्ट्रातील मराठी भाषा संपुर्ण जगात आकाशातील चांदण्यांसारखी चमकायला पाहिजे.मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने सर्वांना आग्रह करतो की माय मराठी,माझी मराठी, मी मराठी, मातृभाषा मराठी यापध्दतीने जोपासना व्हायलाच पाहिजे.कारण मराठी भाषा हा आपल्या पुर्वजांचा ठेवा आहे आणि ईश्वरी देण सुध्दा आहे.त्यामुळे मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त कसा करता येईल याकडे सर्वांनीच लक्ष देण्याची गरज आहे.कारण मराठी भाषेचा इतिहास, संस्कृती, वारसा याला उंच शिखरावर नेण्याची जबाबदारी युवा पिढीवर आहे. कारण जगात अनेक देशांमध्ये मराठी भाषा बोलली जाते.मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने आपण शपथ घेवुया की मराठी भाषा जगभर पसरवीण्याकरीता आम्ही कटीबद्ध आहोत. याकरीता आजच्या दिवशी जगातील संपूर्ण मराठी भाषिकांनी मराठी भाषा दिवसाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले तर एकाच दिवशी लाखो झाडे लावल्या जातील. यामुळे सर्वत्र हिरवागार गालिचा निर्माण होईल व यामध्ये आपल्याला मराठी भाषेचा वेगळाच आनंद, गोडवा व सुगंध अवश्य दिसून येईल व जगात मराठी भाषेची आगळीवेगळी प्रतीमा पहायला मिळेल आणि जगात एक चांगला संदेश जाईल.

# पीडित भगिनींचे पुनर्वसन व नवजीवन उभारणी



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**भारतीय समाजात वेश्याव्यवसाय फार प्राचीन काळापासून प्रचलित असल्याचे उल्लेख प्राचीन ग्रंथांत आढळतात. ऋग्वेदात अशा स्त्रीला साधारिणी म्हणून संबोधले जाई. पुरुषांना, विशेषत: धनिकांना, अमीर-उमरावांना कामवासनेच्या पूर्तीसाठी रखेल ठेवण्याची किंवा वारांगनेकडे जाण्याची मुभा होती. धर्मसूत्रांत वेश्याभगिनींसंबंधी अनेक विचार प्रकट केलेले आहेत. गौतम धर्मसूत्रात वेश्याव्यवसायाबद्दल माहिती आहे. अशा स्त्रियांच्या दयनीय अवस्थेबद्दल उल्लेख करून त्यांच्या विविध स्तरांची कल्पना धर्मशास्त्रात दिलेली आहे. गौतम ऋषींनी दासी, गणिका व पण्यस्त्री असे त्यांचे वर्गीकरण दिले आहे. दासी ही एकाच पुरुषाची सेवा करणारी, तर पण्यस्त्री सामान्य श्रेणीची वेश्या मानली जाई.**

नृत्यगायनात व इतर कलांमध्ये कुशल असणारी गणिका उच्च श्रेणीची मानली जाई. मृच्छकटिक या संस्कृत नाटकातील नायिका वसंतसेना ही गणिका सुसंस्कृत व कलावती म्हणून वर्णिली आहे. महाभारत काळात राजाच्या दरबारात नृत्यगायन क्षेत्रातील कलावंतिणी राजाच्या छत्राखाली आपली कला जोपासून दरबारात मनोरंजन करीत. महाभारताच्या आदिपर्वात गांधारीच्या अनुपस्थितीत धृतराष्ट्राची सेवा अशा दासींकडून होत असल्याचे म्हटले आहे. उद्योगपर्वात देखील कौरवांच्या दासींचा उल्लेख आहे. या स्त्रिया राजदरबारातील नर्तिकाही असत व राजघराण्यातील पुरुषांच्या रखेल्याही असत. मत्स्यपुराणात वेश्याभगिनींची विविध कर्तव्ये नमूद केलेली आहेत. बौद्ध काळात- इ.स.पू. ७००-५०० दरम्यान अनेक धार्मिक व सामाजिक स्थित्यंतरे घडली. बौद्ध मठांमध्ये गणिकांना प्रवेश दिला जात असे. जातक कथांमध्ये तसेच अन्य बौद्ध वाङ्मयातही आम्रपाली या नृत्यनिपूण गणिकेसंबंधीचे उल्लेख आढळतात. सुमारे पाचशे वर्षे बौद्धधर्माचा अंमल भारतीय समाजावर राहिला, त्या काळात तिला बहिष्कृत केले जात नसावे. गणिकेला सामाजिक प्रतिष्ठा होती. गणिकेला राजाकडून सन्मान व गुणीजनांकडून प्रशंसा लाभत असे, असा उल्लेख नाट्यशास्त्रात आढळतो. ती अभिगमनास व चिंतन करण्यास योग्य अशी असावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे. कौटिल्य अर्थशास्त्रात- इ.स.पू.चौथ्या शतकामध्ये वेश्याभगिनींचे नऊ वर्ग वर्णिले आहेत. तसेच वेश्याव्यवसायाचे नियंत्रण करण्यासाठी नियमावली दिली आहे. त्यांच्या उत्पन्नावर करवसुलीचा अधिकार राजाला असल्याचे नमूद केलेले आहे. वात्स्यायनाने रचलेल्या कामसूत्र (इ.स.तिसरे वा चौथे शतक) या ग्रंथातील वैशिक या अधिकरणामध्ये विविध प्रकारच्या वारांगनांसंबंधी माहिती आली आहे. या काळात वेश्यागमन जरी समाजमान्य असले, तरी विविध जातींप्रमाणे वेगवेगळे स्थान होते. कामसूत्रामध्ये कुंभदासी, परिचारिका, स्वैरिणी, कुलटा, नटी, शिल्पकारिका, रूपाजीवा व गणिका असे वर्ग नमूद केले आहेत. जिला चौसष्ट कला अवगत आहेत, ती गणिका होय. या काळातील समाजव्यवस्थेत वेश्याव्यवसायाला विशिष्ट स्थान व दर्जा दिलेला आहे. समाजाचे ते एक अविभाज्य अंग होते. जैन राजांची कारकीर्द- इ.स.दुसरे शतक यांत राजदरबारातील कलावंतीण ही राजाची रखेली असे व तिने इतर पुरुषांबरोबर संबंध ठेवणे निषिद्ध होते. मात्र सामान्य जनांना रिझविणाऱ्या सामान्य नर्तकी या इतर वर्गांतील पुरुषांबरोबर संबंध ठेवू शकत. मात्र काळाच्या ओघात वारांगना व गणिका हा भेद नष्ट झाला. त्यांची निर्भर्त्सना व अवहेलना होऊन त्यांना अमीर उमरावांकडून उपमर्द सोसावा लागला. चाणक्य नीतिसार या ग्रंथात सामान्य वेश्याभगिनींची दयनीय अवस्था वर्णिली आहे.

भारतातील पारंपरिक समाजव्यवस्थेमध्ये वारांगना वा कलावंतीण ही अखंड सौभाग्यवती म्हणून संबोधली जाई. दक्षिण भारतात नववधूचे मंगळसूत्र कलावंतीण ओवून देत असे. दुर्गापूजेसाठी देवीच्या मूर्तीसाठी शकुन म्हणून वेश्येच्या घरातील माती आणून सुरुवात करीत. लैंगिकसंबंधाचे नियमन करताना पारंपरिक समाजात विविध रूढी-परंपरेमुळे काही प्रमाणात विवाहबाह्य संबंधांना मान्यता होती. भारतातील रूढी परंपरांनुसार काही धार्मिक भावना आणि अंधश्रद्धा या देवदासी प्रथेला पोषक ठरल्या. तिसऱ्या शतकातील धार्मिक ग्रंथांत व साहित्यांमध्ये या प्रथेचा उल्लेख आढळतो. अथर्व वेदामध्ये देवदासींना गंधर्व गृहिता म्हटले आहे. कालिदासाच्या मेघदूतामध्ये देवदासींचे काव्यात्मक वर्णन आढळते. कल्हणाच्या राजतरंगिणी ग्रंथात सातव्या शतकापासून ही प्रथा उत्तर भारतात रूढ असल्याचे म्हटले आहे. वाराणसीच्या विश्वनाथ मंदिरात नृत्यनिपुण देवदासी होत्या. महाराष्ट्रातही खंडोबाला मुरळी म्हणून मुली वाहिल्या जातात. यातील काही मुरळ्याही वेश्याजीवन पत्करतात. भारतात ब्रिटिश अंमल सुरू झाल्यानंतर या व्यवसायाला वेगळे स्वरूप प्राप्त झाले. उदा.कोलकाता व मुंबई येथील यूरोपीय व्यापाऱ्याच्या सोयीसाठी कुंटणखाणे निर्माण झाले. कोलकाता शहरातील कलिंगा बाजार व चितपूर येथील वेश्यावस्तीसंबंधीचे उल्लेख तत्कालीन जनगणनेत सापडतात. बंगालमध्ये कुलीन पद्धतीमुळे ब्राह्मणांना बहुविवाह करण्यास मुभा होती. कौटुंबिक प्रतिष्ठेसाठी अनेक आईबाप भरमसाट हुंडा देऊन आपली मुलगी उच्चजातीय ब्राह्मणांना देऊ करीत. जरठ पातीच्या निधनामुळे अनेक अश्राप मुली बालविधवा होत. ज्या सती जात नसत त्यांची अवहेलना होई व त्यामुळे त्यांना कुंटणखान्यात आश्रय घ्यावा लागे. तत्कालीन बंगाली साहित्यात देखील कलानिपुण वेश्यांभगिनींसंबंधी उल्लेख आढळतात. शरदचंद्र चतर्जींच्या श्रीकांत, देवदास कादंबरीमधून या स्त्रियांची संस्कृती व पिळवणूक यांचे चित्रण आढळते. श्रीमंत जमीनदार व व्यापारी हे रखेल्या ठेवणे ही प्रतिष्ठेची बाब समजत. रखेल्यांना बंधावेश्या म्हणत व त्यांना घरदार व दागदागिने दिले जात.

मुंबई वेश्याव्यवसाय प्रतिबंधक कायदा १९२३अन्वये वारांगनेच्या उत्पन्नावर जगणे, हा गुन्हा ठरविण्यात आला आहे. भारतातील वेश्याव्यवसाय, अनैतिक व्यापारबंदी आणि अजाण मुलींचे संरक्षण या दृष्टीने झालेले कायदे असे- वेश्याव्यवसाय प्रतिबंधक कायदा- मुंबई १९२३ व सौराष्ट्र १९५२. अनैतिक व्यापारनिर्मूलन कायदा- मद्रास १९३०, बंगाल १९६३, उत्तरप्रदेश १९३३, पंजाब १९३५, बिहार व मध्यप्रदेश १९५३, म्हैसूर १९३० व हैदराबाद १९५२. अजाण मुली संरक्षण कायदा- उत्तरप्रदेश १९२६. नाईक मुलीसंरक्षण कायदा- १९९०. देवदासी प्रतिबंधक कायदा- मुंबई १९३४ व चेन्नई १९४७. संपूर्ण भारतासाठी १ मे १९५६ रोजी स्त्रिया व मुली यांच्या अनैतिक व्यापारास बंदी करणारा कायदा लागू करण्यात आला. मात्र या प्रश्नाचे गांभीर्य ध्यानात घेऊन भारतीय पतित उद्धारण संघटना यांसारख्या बिगरशासकीय संस्थांनी जी पाहणी केली- १९९३अनुसार महाराष्ट्र राज्यात सर्वांत अधिक म्हणजे ३.५ लाख वेश्याभगिनी होत्या. या सर्वेक्षणानुसार भारतामध्ये अकराशे लालबत्ती- रेडलाइट क्षेत्रे असून सुमारे २३,८८,३३० भगिनी या धंद्यात आहेत.

सरकारी व बिगरसरकारी पातळ्यांवरून





शरीरविक्रय करणाऱ्या महिलांसाठी उपक्रम राबविण्यात येतात. महिला व बालकल्याण संचालनालयामार्फत मुलींसाठी प्रमाणित शाळा तसेच महिला संरक्षणगृहे स्थापन केली आहेत. या ठिकाणी सुटका केलेल्या भगिनींचे पुनर्वसन व नवजीवन उभारणीचे प्रयत्न केले जातात. महाराष्ट्रातील प्रमुख शहरांतून असे प्रयत्न करण्यात येतात. मुंबई शहरातील कुंटणखान्यांमधील बळजबरीने डांबलेल्या मुलींसाठी अनेक स्वयंसेवी संस्था कार्य करतात. संवेदना व समर्थन या संस्थांतर्फे नेपाळ व इतर राज्यांतून फसवून आणलेल्या मुलींना साहाय्य केले जाते. त्याचप्रमाणे प्रयास ही संस्था महिलांच्या लैंगिक शोषणासंबंधी कार्यरत आहे. लालबत्ती विभागात काम करणाऱ्या विविध संघटनांनी मुंबईच्या प्रेरणा या संघटनेमार्फत नॅकसेट कार्यजाळे सक्रिय केले आहे. कुंटणखान्यातील शोषित महिला व मुलींसाठी पुनर्वसनाचे काम यांद्वारे चालते. महाराष्ट्र राज्याच्या सर्व विभागांत नॅकसेट च्या सहयोगी संस्था आहेत. नगर जिल्ह्यातील स्नेहालय ही अशीच एक सदस्यसंस्था आहे. महात्मा फुले प्रतिष्ठानच्या माध्यमातून संवेदना ही संस्था सन १९८०पासून मुंबईतील कामाठीपुरा परिसरात अनेक उपक्रम राबविते. वारांगना आरोग्य, कायदेविषयक साहाय्य व पर्यायी रोजगाराबाबत मदत केली जाते. नारी संघर्ष पंचायत या नावाने येथील भगिनी स्वतःच संघटित होऊन स्वतःचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न चालविले आहेत. आशा हा प्रकल्प मुंबई महापालिकेतर्फे, एडस् व इतर यौनकर्माशी संबंधित आजारांबाबत जागरूकता वाढविणे व उपचार करण्याबाबत ठोस काम करीत आहे. वरील प्रकल्पाशी संलग्न अशा तीस संस्था वारांगनांमध्ये एडस्‌बाबत जागृती आणणे, ऐच्छिक रक्ततपासणी मोहिमा व निरोध- कंडोम वापराबाबत माहिती देणे, आदी कामे करतात. मुंबईखेरीज इतर शहरांमध्येही स्वयंसेवी संस्थांचे कार्य चालते. नेटवर्क अगेन्स्ट कमर्शिअल सेक्स्युअल एक्सप्लॉयटेशन अँड ट्रॅफिकिंग ही नगरमधील स्वयंसेवी संस्था, लालबत्ती विभागात शरीरविक्रय व लैंगिक शोषणाविरुद्ध कार्य करीत आहे. कोलकाता येथे नोव्हेंबर २००० साली वारांगनांची परिषद झाली. या परिषदेस आशिया खंडातील अनेक देशांतील भगिनी उपस्थित राहिल्या. त्यांचे माणूस म्हणून हक्क जपण्यासाठी व समाजात मिळणारी उपेक्षा कमी करण्यासंबंधी या परिषदेत आवाज उठविण्यात आला. या परिषदेचे संयोजन दुर्बार महिला समन्वय समिती या बंगालमधील महिलांच्या संस्थेने केले. येथील सोनागाची प्रकल्पाद्वारे त्या भगिनींना एड्सबाबत माहिती मिळते. पुणे शहरामधील वंचित विकास ट्रस्टतर्फे निहार हा एक लक्षणीय प्रकल्प चालविला जातो. सन १९८९पासून येथे अशा भगिनींच्या बालकांसाठी निवासी केंद्र चालविले जाते. या मुलांना पालनपोषण, शिक्षण व रोजगार मिळवून देण्याचे कार्य चालू आहे. अशा प्रकारचा हा पहिलाच प्रकल्प आहे. स्त्रियांच्या प्रश्नावर विचार व कृती करण्यासाठी महाराष्ट्र सरकार व पोलीस विभागाने सुरक्षा समित्या स्थापन केल्या आहेत. महिला व बालकल्याण संचालनालयातर्फे निराश्रित महिलांना नारी निकेतन संस्थातर्फे साहाय्य मिळते. मात्र सरकारी योजनांना जोड म्हणून स्वयंसेवी संस्थांचे या क्षेत्रातील कार्य अनिवार्य आहे. वेश्याव्यवसायास कारणीभूत ठरणारे घटक- कोणत्याही समाजात वेश्यावृत्ती व वेश्याव्यवसाय निर्माण होण्यास व फोफावण्यास कारणीभूत ठरणाऱ्या अनेकविध घटकांमध्ये मुख्यत्वे या बाबींचा समावेश होतो- वेश्याव्यवसायास चालना देणाऱ्या प्रेरक घटकांमध्ये स्त्रियांची कौटुंबिक पार्श्वभूमी महत्वाची ठरते. आई- वडिलांमधील सततचे तणाव व संघर्ष, व्यसनाधीन वडील किंवा वेश्याव्यवसाय करणारी आई-बहीण असणे, अशा परिस्थितीमुळे स्त्रीवर ही आपत्ती ओढवू शकते. स्त्रीला वेश्याव्यवसायाकडे आकृष्ट करणारे घटक मुख्यतः आर्थिक स्वरूपाचे असतात. दारिद्र व उपासमारीमुळे ग्रामीण भागातील स्त्रियांना फसवून, नोकरीची वा विवाहाची खोटी आमिषे दाखवून कुंटणखान्यात आणून विकले जाते. अनाथ तसेच परित्यक्ता स्त्रियांना कधीकधी शरीर विक्रयावाचून इलाज उरत नाही. त्याचप्रमाणे चंगळवादी शहरी संस्कृतीमुळे अधिक पैसा कमविण्याकरिता काही स्त्रिया कॉलगर्लचा व्यवसाय पत्करतात. यांतील काही नोकरीच्या व्यतिरिक्त कमाईसाठी कुमार्गाला वळतात. शहरातील हॉटेले, क्लब व इतर मनोरंजनाच्या ठिकाणी या स्त्रियांचे दलाल गिऱ्हाईक पटवितात व अनैतिक व्यवहारांना संघटित स्वरूप प्राप्त होते. वेश्याव्यवसाय पत्करण्यामागचे निर्णायक घटक- प्रिसिपिटेटिंग फॅक्टर्स हे प्रामुख्याने निराधार व फसविल्या गेलेल्या स्त्रियांच्या बाबतीत बलवत्तर ठरतात. कुमारी मातांना कुटुंबातून बहिष्कृत केले गेल्यास त्यांची दयनीय परिस्थिती होते. अशिक्षित व गरीब मुलींना असाहाय्यतेमुळे वेश्याव्यवसाय करावा लागतो. समाजात वेश्याव्यवसाय फैलवण्यामागे आणखीही काही निर्णायक घटक कार्यरत असतात. विवाह हा लैंगिक गरजा भागविण्याचा रीतसर मार्ग असला, तरी त्याद्वारे समाजातील सर्वच स्त्रीपुरुषांच्या सर्व प्रकारच्या शारीरिक गरजा भागवल्या जातातच, असे नाही. अनेक कारणांनी विवाहासारखा पर्याय काही व्यक्तींच्या बाबत कधी दुर्लभ, तर कधी असफल ठरतो. अशा परिस्थितीतील पुरुषांना विवाहबाह्य संबंध ठेवणे शक्य होत नाही. वेश्यांबरोबर संबंध ठेवणे सोपे जाते, कारण तेथे परस्परांबद्दलचे भावनिक आकर्षण, प्रेम, बांधीलकी, निष्ठा यांचा पूर्ण अभाव असतो. पैशाच्या मोबदल्यात शारीरिक गरज भागू शकते. अनेकवेळा विकृत किंवा अनैसर्गिक गरजा भागविण्यासाठी त्यांचा उपयोग घेतला जातो. शहरीकरणामुळे व दारिद्र्यामुळे शहरात कामासाठी एकटे राहणाऱ्याची संख्या वाढते. हुंड्यासारख्या प्रश्नांमुळे विवाहित स्त्रीला छळ व अवहेलना सोसावी लागते व स्वतःचा बचाव करण्याकरिता कधीकधी घर सोडावे लागते. या निराधार स्त्रियांची विटंबना टळू शकत नाही व त्यांना अनिच्छेने या व्यवसायात ओढले जाते. लैंगिक संबंधांविषयीचे अज्ञान तसेच संपर्कमाध्यमांतून दाखविले जाणारे अश्लील व बीभत्स स्त्री-पुरुष संबंध यांचा प्रभाव तरुण अजाण मुलामुलींच्या अधःपतनास कारणीभूत होतो. तरुण मुलींच्या वाट्याला अकाली मातृत्व व बहिष्कार आल्यामुळे त्या या व्यवसायात पडतात, हे येथे निंदनीयच!

# अवखळ, सुंदर, खळाळते जळ : डॉ. विजया वाड

आधुनिक केसरी

**एकनाथ आव्हाड हे बालसाहित्यातील आघाडीचे नाव आहे. करी मनोरंजन मुलांचे, जडेल नाते प्रभुशी तयाचे 'हे अणु त्यांनी साथ केले, आपल्या शिक्षकी पेशास अनुसरून निसर्गाच्या. A जवळ बालकांना घेऊन गेले आहेत: मेहता पब्लिशिंग हाऊस नामवंत प्रकाशन संस्थेनं त्यांचे 'खळाळता झरा आणि इतर कथा हे पुस्तक प्रकाशित केले आहे. गेली २८ ते शिक्षकी पेशात आहेत आणि बाबांची, आशा, अपेक्षा यांचे त्यांना नेमके आहे. खळाळता ही 'कल्पना' आपल्या मित्राला घानी, उंचीने लहान पण कलेने महान मित्र! वीरेंद्र ! जणु खळाळता झरा! "पुस्तकांचा खाऊ 'ही कल्पना या कथेत एकनाथांनी मांडली. यांचा 'धर्मा' या तीन महोल्लेख मनाला भावतो, आणि बालवाचकांना वाचन-उत्सुक करून जातो.**




कस्तई 'का मोडीत निघालेला, जवळ जवळ शहर भागातून अदृश्य प्रकार! आता स्टेनलेसवरीलचा जमाना आला ना ! पण एकनाथ 'कल्लईवाला' ही कथा लिहून या जुन्या व्यवसायाला व्यवसायाला "मदतीचा हात 'ही शीता (सीता) नि या दोन संख्यांची कथा) शमिता, खेळातच रमलेल्या, शीना' चे लक्ष नि दाजराकडे कसे वळवते नि शाळेतल्या गमती गमती सांगून शिक्षणास शिक्षणास कशी उद्युक्त करते भाग इनका मनोरंजक झाला आहे की, ही कथा वाचाच! तुमची परत 'नरोनाज' होतील झोपडीतल्या एखाद्या बालकाच्या हाती पाटी दप्तर देण्यासाठी उत्सुक होतील. 'श्रावणसरी आल्या घरी 'यांतील 'साजिरा गोजिरा आला श्रीरंश श्रीरंश ग आकाशी बांधितो इंद्रधनूचे तोरण! 'अशा मनभावन ओळी आपले चित्त आकर्षून घेतात. यात काळानुरूप 'गुगलआजी 'सुद्धा आहे बरे का! एकनाथना काळाचे भान विशेषकरून आहे. बालकांना काय हवे, कालमानानुसार त्यांच्या कोठे, कशा विकसित काव्यात हे समजते तो यशस्वी बाललेखक अशा बालले खका पैकी आहेत. जुन्या-नव्याची घालणारे लेखक कथातून कवितेची, वाक्प्रचारांचा, म्हणींची आणि मुख्यत्वेकरून खुबीने पेरणी करणारे यशखी लेखक

**एकाएक सुंदर कथा, सुंदर चित्रांनी नटलेली
सुंदर सुंदर सजलेली, मोहक तेन मांडलेली,
संस्काराची दिक्षा रुजविणारी,
फुलविणारी,** मने संस्कारक्षम करणारी

एकनाथांची ही वाटचाल अशीच बालमने संपन्न करीत राहो त्यांना धन संपन्न 'देत. आणि चांगला घडवत राहण्यासाठी अशीच लिहितो राहो, ही शुभेच्छा विजया वाडूउजाळा देतात मुलाना कल्हईवाल्याची ओळख करून देतात आणि अत्यंत माणसे प्रामाणिकपणा जपतान, तो कसा? त्याचे मनोरम आपल्या कथेतून चित्रित करतात एकनाथ आव्हाड कथेच हे वैशिष्ट्य आहे, सुबोध शैलीतून, सरकार द्यावेत. बालांच्या जगात त्यांचे बीज पेरावे. अन् संस्कारांची पाने, फुले लेवून आयुष्ये सजली तर 'चांगला समान' घडायाग या हातभार लागेल ना! एकनाथ आव्हाड लेखणीचा त्यात महत्त्वाचा वाटा असेल त्याचप्रमाणे 'मोठा' 'हा छोटा' हे भेदाभेद नवसमाजातून वितळून. म्हणी आणि वाक् प्रचार ही 'मराठी' कामाचा डोंगर उपसणे । ताकाला जाऊन भांड लपवणे" "नमनाला घडाभर तेल लावणे. 6 पळसाला तीन 'या सारख्या सारख्या म्हणी, वाक्प्रचार आता कालमंगत विसरसीमेवर आहेत. पण त्यांची ओळख एकनाथ आव्हाड आपल्या म्हणीची गंमत, गणांची संगत 'या अक्षरमैत्रातून देतात. या कक्षेत एक सुंदर कविता देखिल आहे. आणि ' वो भी **जमी है 'अशा प्रकारातली.**

**‘रात्री चंद्राला आलो भेटून, चांदण्या
आणल्या खिशात दिल्या मुलांना वाटून .....**

असे सुंदर कल्पनाचित्र | मुले बेहदद खुश ना ? निश्चितच आपला पेशा आणि आपली लेखणी याचा सुंदर मिलाफ एकनाथ आव्हाड यांच्या दिसून येतो. त्यांचे अभिनंदन!

# झाड तोडू नको म्हणल्याच्या कारणावरून मारहाण

## घेरडी, ता. सांगोला येथील घटना; ५ जणांविरोधात गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** सोमवार, २७ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घेरडी, ता. सांगोला येथे उद्या आपल्या जागेची मोजणी आहे, तू झाड काय तोडू नकोस, असे म्हणाल्याच्या कारणावरून पती-पत्नीस भावकीतील ५ जणांनी मिळून मारहाण केली असल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी दिनांक २७ फेब्रुवारी रोजी दत्तात्रय शिवाजी जगधने यांनी सांगोला पोलीसात हणमंत टोपा जगधने, बाबासाहेब टोपा जगधने, मुकुंद टोपा जगधने, पिंटु सदाशिव जगधने, छाया सदाशिव जगधने सर्व रा. घेरडी ता. सांगोला यांच्याविरोधात फिर्याद दिली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २७ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी यांचा चुलत भाऊ हणमंत जगधने हे फिर्यादी यांच्या शेतातील लिंबाच्या झाडावर चढलेला होता. म्हणून फिर्यादी यांनी त्यास तू झाडावर का चढला आहे असे विचारले असता, त्याने फिर्यादीस मी झाड तोडणार तुला काय करायचे ते कर असे म्हणून शिवीगाळी, दमदाटी केली. झाडावरुन खाली उतरला असता, फिर्यादी त्यास म्हणाले की, उद्या आपल्या जागेची मोजणी येणार आहे. त्यामुळे तू झाड काय तोडू नकोस. तेव्हा हणमंत जगधने याने हातातील काठीने फिर्यादी यांना डोकीत मारुन जखमी केले तर इतर चौघांनी हाताने लाथाबुक्याने मारहाण करण्यास सुरुवात केली, त्यावेळी फिर्यादी यांच्या पत्नी सिमा ह्या भांडणे सोडवत असताना छाया जगधने यांनी तीच्या हातातील लाकडाने डोकीत मारुन जखमी करुन ते निघून गेले, असे फिर्यादीत म्हटले आहे.



## वडोदवाडी येथे शंकरपटाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद खु. वाडी येथे ब्रह्मलीन संत श्री पुर्णगिरीजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य जंगी शंकर पटाचे आयोजन करण्यात आले असून शनिवार रोजी या पटाचे उद्घाटन संपन्न झाले.या उद्घाटन प्रसंगी सरपंच पाकीजा साबेर पठाण, उपसरपंच गोपाल वाघ, गोविंद पांडेजी, वडोद बाजार पोलीस स्टेशनचे पीएसआय संभाजी खाडे, सरपंच जगन दाढे ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग मंदाडे,सामाजिक कार्यकर्ते प्रविण एखंडे, अमोल भैया तुपे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुर्णगिरीजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य जंगी शंकर पटाचे आयोजन करण्यात आले असून दि. २५ व २६ फेब्रुवारी या दोन दिवसी हा पट भरणार आहे. यात अनेक मोठ मोठी व वेगवेगळ्या गटात बक्षिसांची खैरात करण्यात आली आहे. या जंगी शंकर पटाचे अध्यक्ष आप्पा तायडे, उपाध्यक्ष दसरू मंदाडे, व गावकऱ्यांनी आयोजन यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहे. यावेळी डॉक्टर रवि जाधव, डॉक्टर राम आहेर, ग्रामपंचायत सदस्य सुहास वायकोस ग्रामपंचायत सदस्य राजीक शेख, ग्रामपंचायत सदस्य शुभम गंगावणे, कडूबा मस्के, अशोक शिंगारे, साबीर पठाण,आळंद उपसरपंच रामेश्वर चोपडे, उमाजी खाकरे ,पांडुरंग ब्राह्मणे, बबन मंदाडे, सर्जेराव गाडेकर, काकाजी कोलते, आदिनाथ दुधे, अरुण वायकर, आसाराम कोलते,राहुल खाकरे,साईनाथ बेडके, शंकर तुपे, ऋषभ पांडेजी, काकाजी वाघ, आजिनाथ वाघ, साहेबराव खाकरे, शिवाजी खाकरे, पांडुरंग तायडे, आर्मी अशोक खाकरे, बाळू जाधव,नामदेव गाडेकर,सतीश वाघ, नवनाथ दुधे, तुळशीराम गाडेकर,किरण पवार, राजू खाकरे, गजानन गाडेकर गावकरी उपस्थित होते.

व ग्रामपंचायत कर्मचारी कृष्णा सहाने, मनोज वाघ,संजू मंदाडे, बाळू वाघ, सद्दाम शेख, गणेश धनके, शकील शेख,उपस्थित होते.

तालुक्यातील वडोदवाडी येथे घेण्यात आलेल्या दोन दिवसिया शंकर पटात ११५ बैलजोड्यांनी सहभाग घेतला होता हि स्पर्धा राजूर येथील शिवा-भारत या बैल जोडीने तीनशे फुटाचे अंतर केवळ ५ सेकंदात गाठून पहिले बक्षीस पटकावले

वडोदवाडी येथे शनिवार व रविवार या दोन दिवस शंकर पाटाचे आयोजन करण्यात आले होते यात पहिल्या दिवशी गावगाडा मधील ४५ बैल जोडीने सहभाग घेतला होता तर दुसऱ्या दिवशी औरंगाबाद, बुलढाणा ,जालना या जिल्ह्यातील ७० बैल जोड्यांनी भाग घेतला यामध्ये शंकर पाटाचा थरार दिसून आला.

राजूर येथील उमेश भोपळे यांच्या शिवा व भारत या बैअल्च्य जोडीनी तीनशे फुटाचे अंतर केवळ ५ शेकंद ८३ मिली या वेळात पूर्ण करून ३१ हजार रुपयाचे पहिले बक्षीस पटकावले तर दुसरे बक्षीस खडकवाडी येथील पृथ्वीराज राजपूत यांच्या लाडक्या व बादल या बैलजोडीने २१ हजाराचे बक्षीस मिळविले .

या शंकर पट करिता आत्माराम तायडे, सुभाष मंदाडे , सरपंच पाकिजा पठान,उपसरपंच गोपाल वाघ,शिवाजी खाकरे , उमाजी खाकरे, सोमीनाथ खाकरे , सांडू दुधे , सुनील मंदाडे,बाबुराव जाधव, रवींद्र गाडेकर सह ग्रामपंचायत च्या सदस्यांनी पुढाकार घेतला होता .

## सोळा वर्षीय मुलाचे अपघाती निधन

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** कडलास गांवातील प्रेम



बिरूदेव भजनावळे वय वर्ष सोळा यांचे आपघाती निधन झाले. वडील ऊसतोड मजूर आहेत. निधनाची बातमी गांवात कळताच कडलास गांवावर शोककळा पसरली. अधिकची माहिती अशी की कडलास वरून मंगळवेढा कडे तीन चाकी डमडमने रात्री दहाच्या सुमारास सांगोल्यातील श्री दत्त हॉस्पिटल जवळ डमडम जागेवर पलटी झाल्याने गंभीररीत्या जखमी झाले होते. जखमींना हॉस्पिटलकडे पाठविण्याची व्यवस्था सांगोला नगरीचे संपादक सतीश भाऊ सावंत व शुभम पाटील यांनी केली. दोन मार्च रोजी दहावीच्या बोर्डाची परीक्षा तो देणार होता पण त्यापूर्वी काळाने त्याच्यावर घाला घातला.बहुउद्देशीय प्रशालाचा तो विद्यार्थी. आपल्या शाळेतील विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची बातमी कळताच शाळेने एक दिवसाची सुट्टी जाहीर केली.गांवात मात्र शोकाकूल वातावरण निर्माण झाले. सर्व स्तरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. अंत्यसंस्कार कडलास येथील वैकुंठ भूमी या ठिकाणी सकाळी नऊ वाजता झाले. तिसरा गुरुवार सकाळी आठ वाजता कडलास येथील वैकुंठ भूमी या ठिकाणी होणार आहे. त्याच्या पाश्चात आजी आजोबा आई-वडील चुलता चुलती भाऊ बहीण असा परिवार आहेत.



## डॉ. नितीन बाबर यांच्या अर्थप्रवाहला शिवाजी विद्यापीठाचा उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र असोसिएशन ( सुयेक ) आणि बळवंत कॉलेज विटा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३३ व्या वार्षिक अधिवेशनामध्ये डॉ. नितीन बाबर यांच्या अर्थप्रवाह' या पुस्तकास शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र असोसियशनचे अत्यंत प्रतिष्ठेचा 'कुसुमताई राजारामबापू पाटील 'उत्कृष्ट ग्रंथ परितोषिक सुयेकचे माजी अध्यक्ष माजी प्राचार्य डॉ. अर्जुनराव महाडीक सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, सुयेकचे विद्यमान अध्यक्ष प्रा.डॉ. राहूल म्होपरे, माजी अध्यक्ष्या प्राचार्या डॉ तेजस्वीनी मुडेकर, कार्याध्यक्ष प्रा.डॉ.एम.जी. पाटील, शिवार्थ संपादक प्रा.डॉ. जयंत इंगळे, सचिव प्रा.संजय धोंडे, डॉ. प्रविन बाबर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. बाबर हे सांगोला महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागात सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत असून सातत्याने त्यांचे शेती, ग्रामीन अर्थकारणावर संशोधनात्मक लेख दै.ॲग्रोवन, पुण्यनगरी अशा वेगवेगळ्या वर्तमान पत्रात प्रकाशित होत असतात. म्हणूनच यावर्षी सुयेकमार्फत त्यांचा, सन्मानपत्र, व रोख रक्कम देवून गौरव करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल माजी कुलगुरू योगेंद्र नेरकर, माजी मुख्य सचिव डॉ सुधीरकुमार गोयल जेष्ठ राजकीय विश्लेषक प्रा.डॉ. भालबा विभुते, शिवाजी विद्यापीठ अधिष्ठाता प्रा.डॉ. एम. एस. देशमुख जेष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. विजय ककडे यांनी त्यांचे कौतुक केले आहे. त्यांना सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष मा.ता. ना. केदार, प्रा.पी.सी. झपके सर तसेच सचिव मा.म.सि. झिरपे व इतर सर्व संस्था सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ सुरेश भोसले, माजी प्राचार्य डॉ कृष्णा इंगोले, डॉ मधूसुदन बचूटे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. तर महाविद्यालयातील इतर सर्व सहकारी प्राध्यापक व कार्यालयीन अधिक्षक मा पी.एस. शिंदे सर तसेच इतर प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी व चोपडी गावचे ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.




## उमंग पब्लिक स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील उमंग पब्लिक स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले असुन मुलाच्या कलागुणांना वाव मिळावा ,लहान मुलांना व्यासपीठ उपलब्ध होऊन आपल्या मधील सुप्त गुण सादर करता यावे यासाठी अतिशय उत्कृष्ट नियोजन उमंग पब्लिक स्कूल च्या माध्यमातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित भाजपा जिल्हाउपाध्यक्ष संजय खंबायते हे कार्यक्रमाचे उद्घाटक होते. प्रमुख पाहुणे जिल्हा परिषद सदस्य किशोर पवार, माजी उपसभापती काकासाहेब तायडे, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव, उद्योजक आरिफ शाहा, नगरसेवक अय्याज शहा, तालुका अध्यक्ष भगवान कोल्हे, उपप्राचार्य संतोष मतसागर, राजेंद्र गव्हाणे, आसिफ शेख, सुभाष काळे, उज्ज्वला बिरारीस, नाजीया मॅडम, मीनाक्षी भामरे, कैलास जाधव, प्रा. संतोष शिरसाठ, शिवाजी गायकवाड, दीपक कुमावत, दीपक वारे, राजू सपकाळ, गायकवाड, पवन खंडेलवाल, आकाश पगारे,राजेंद्र इंगळे, पोपट इंगळे, वाल्मिक इंगळे, रवी पाटील, आबा इंगळे, दिलीप बोरसे, प्रवीण गाढे, अविनाश काळे, बाळू डगळे,सचिन बोडखे, गणेश भाऊ निकम, उत्कृष्ट सूत्रसंचालन करणारे डॉ. सुहास इंगळे, संस्थेचे सर्व सन्मानीय उपाध्यक्ष पुंडलिक नाना इंगळे, आण्णासाहेब इंगळे, संतोष इंगळे , शिक्षक वृंद, शीतल पाटील, थोरात मॅडम, चादर मॅडम, सचिन पिंपळे, ऋषिकेश पंडित, कटारे सर यांची उपस्थीती होती.

## नीरा देवधरचे हक्काचे पाणी सांगोल्यासह पंढरपूर तालुक्याला मिळणार : चेतनसिंह केदार-सावंत

आधुनिक केसरी न्यूज

**रवींद्र कांबळे**

**सांगोला :** पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठी



फायदेशीर ठरणाऱ्या नीरा देवघर धरणाच्या कालव्यासह तीन उपसा सिंचन योजनांच्या कामांसाठी सुमारे चार हजार कोटी रुपयांच्या तिसऱ्या सुधारित प्रशासकीय प्रस्तावाला मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. दरम्यान या योजनेत सांगोला आणि पंढरपूर तालुक्याचा समावेश करण्यासाठी राष्ट्रवादीसह आ. रामराजे निंबाळकर यांनी विरोध केला होता. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे खा.रणजितसिंह निंबाळकर, आमदार शहाजीबापू पाटील यांनी केलेल्या पाठपुराव्यास यश आले असून सांगोला आणि पंढरपूर तालुक्याचा नीरा देवघर सिंचन योजनेत समावेश झाला असून या दोन्ही तालुक्याला हक्काचे पाणी मिळणार असल्याचे भाजपचे तालुकाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी सांगितले. नीरा देवधर ही सिंचन योजना पूर्णत्वास आणण्यासाठी तसेच या योजनेत सांगोला आणि पंढरपूर तालुक्याचा समावेश करण्यासाठी खा. रणजितसिंह निंबाळकर, आमदार शहाजीबापू पाटील, भाजपचे तालुकाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. नीरा देवघरचे सांगोला, पंढरपूर, माळशिरस तालुक्यांचे हक्काचे पाणी बारामतीकरानी पळवल्यानंतर खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी खा. शरद पवारांसह राष्ट्रवादीच्या नेत्यांवर जोरदार निशाणा साधला. नीरा देवघर योजनेत सांगोला आणि पंढरपूर तालुक्याचा समावेश करून हक्काचे पाणी देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे खासदार रणजितसिंह निंबाळकर, आ. शहाजीबापू पाटील, चेतनसिंह केदार-सावंत यांनी सातत्याने पाठपुरावा केला. नीरा देवघर धरणाच्या कालव्यासह तीन उपसा सिंचन योजनांच्या कामांसाठी सुमारे चार हजार कोटींच्या तिसऱ्या सुधारित प्रशासकीय प्रस्तावाला मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. नीरा देवघर सिंचन योजनेत सांगोला आणि पंढरपूर तालुक्याचा समावेश करण्यासाठी आमदार रामराजे निंबाळकर यांच्यासह बारामतीकरांनी विरोध केल्याने खा. रणजितसिंह निंबाळकर यांनी आक्रमक भूमिका घेत लढा उभा केला.

# वीज कामगारांच्या कामाचा होतोय पहिल्यांदाच सन्मान



## ४ मार्च रोजी 'लाईनमन डे'

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** केंद्र शासनाने ४ मार्च २०२३ रोजी देशभरात 'लाईनमन दिवस' साजरा करणेबाबत सर्व सार्वजनिक आणि खाजगी विदयुत क्षेत्रातील आस्थापनांना निर्देशित केले आहे. त्यानुसार ४ मार्च रोजी महावितरणच्या लातूर परिमंडलातही विविध स्तरावर 'लाईनमन दिवस' साजरा करण्यात येणार असून त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीपासून पहिल्यांदाच 'लाईनमन दिवस' साजरा करण्यात येत असल्याने विदयुत क्षेत्रात अत्यंत जोखमीचे व कष्टदायी काम करुन जनतेला प्रकाश पुरविणाऱ्या लाईनमन वर्गात उत्साहचे वातावरण आहे.

जनमित्र अर्थात लाईनमन हा विदयुत वितरण व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. महावितरणचे जनमित्र ऊन, वारा, पाऊस तसेच इतर अत्यंत खडतर परिस्थितीत ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठयासाठी चोवीस तास सेवा देतात. देशभरातील लाईनमनबदल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर लाईनमन दिवस साजरा करण्यात येणार आहे. केंद्र शासनाने लाईनमन दिवसाच्या आयोजनाबाबत दिलेल्या निर्देशानुसार महावितरणतर्फे प्रादेशिक व परिमंडलस्तर, मंडल व विभागस्तर आणि प्रामुख्याने ग्रामीण भागात उपविभाग किंवा अतिदुर्गम भागातील शाखा कार्यालयातही स्वतंत्रपणे लाईनमन दिवसाचे आयोजन करण्यात येणार आहे. त्या त्या स्तरावर सहव्यवस्थापकीय संचालक किंवा प्रादेशिक संचालक, मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता आदी कार्यालय प्रमुख या कार्यक्रमास उपस्थित असतील. अशा कार्यक्रमातून वीज सुरक्षेची शपथ, सुरक्षेबाबत प्रबोधन आणि महिला व पुरुष लाईनमन यांचे अनुभव कथन होऊन त्यात त्यांचा यथोचित सन्मान करण्यात येणार आहे.

लातूर परिमंडलातील लातूर, बीड आणि उस्मानाबाद जिल्हयात विविध स्तरावर ४ मार्च रोजी होणाऱ्या लाईनमन दिवस कार्यक्रमास नियमित व बाह्यस्त्रोत अशा सर्व महिला व पुरुष जनमित्रांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी केले आहे.



# राज्यस्तरीय स्पर्धेत राष्ट्रीय कॉलेज ऑफ फार्मसीने पटकावले प्रथम पारितोषिक

आधुनिक केसरी न्यूज

**मुळा :** एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ फार्मसी, सोनई जि. अहमदनगर यांनी दि. 28 फेब्रुवारी 2023 रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित केलेल्या राज्यस्तरीय इंटरकॉलेजिएट इनोव्हेटिव्ह आयडियाज -मॉडेल/पोस्टर स्पर्धेत राष्ट्रीय फार्मसी कॉलेज हतनूर ता. कन्नडच्या बी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी मॉडेल मेकिंग सादरीकरण स्पर्धेत कु. कवार रोहिणी आणि कु. मिश्रा रोहिणी यांनी म्युकोस्पिट बॉक्सच्या नाविन्यपूर्ण मॉडेलसाठी प्रथम पारितोषिक पटकावले त्यांना प्रा.डॉ. गजानन वैष्णव, यश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, औरंगाबाद व डॉ. व्ही.के.देशमुख, प्राचार्य, एम.ई.एस. कॉलेज ऑफ फार्मसी सोनई. यांच्या हस्ते प्रथम पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले, स्पर्धेत महाराष्ट्रातील फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला होता, विद्यार्थ्यांना राष्ट्रीय कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील बी. फार्मसी विभागप्रमुख प्रा. सुरेश वाघमारे व प्रा. अमोल दरवडे, प्रा. जितेन्द्र ढोणे यांचे मार्गदर्शन मार्गदर्शन लाभले, संस्थेचे अध्यक्ष मा. आमदार नितीन पाटील, सचिव अर्जुन पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.जी. खणगे व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# डॉ. पं. केशव गिंडे यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त 'वेणूगंधर्व संगीत महोत्सव'

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** अमूल्य ज्योती आणि केशव वेणू प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसिद्ध बासरीवादक आणि केशववेणूचे संशोधक, निर्माते डॉ. पं. केशव गिंडे यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त 'वेणूगंधर्व संगीत महोत्सवाचे' आयोजन येत्या शनिवार दि. ४ आणि रविवार दि. ५ मार्च रोजी करण्यात आले आहे. कर्वेनगर येथील कर्नाटक हायस्कूलच्या सभागृहात हा सोहळा होणार असून सोहळ्याचे हे ३५ वे वर्ष आहे. रविवार ५ मार्च रोजी सायंकाळी सहस्त्रचंद्रदर्शन संगीत सोहोळ्यात पं. गिंडे यांच्या सांगितिक कार्यावर आधारित 'नादब्रह्म' या चित्रफीतीचे उद्घाटन करवीरपीठाचे शंकराचार्य विद्यानृसिंह भारती स्वामी यांच्या हस्ते होणार असून 'वेणू गंधर्व' या पुस्तकाचे प्रकाशन मूर्तीशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ.. गो.ब.देगलूरकर यांच्या हस्ते होणार आहे. पंडित गिंडे यांचे शिष्य, बासरीवादक शशिकांत चिंचोरे यांनी या ग्रंथाची निर्मिती केली आहे. याच ग्रंथांनी पंडित गिंडे यांची ग्रंथतुला यावेळी करण्यात येणार आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या वेणूगंधर्व संगीत महोत्सवात एकूण तीन सांगीतिक सत्रे होणार आहेत. शनिवारी प्रथम सत्रात सायं. ५ वाजता बासरीवादक दिपक भानुसे, गायक पं. सुधाकर चव्हाण, बासरी वादक पं. नित्यानंद हळदीपूर, गायक पं. उदय भवाळकर यांचा कार्यक्रम होणार आहे. तर रविवारी ५ रोजी सकाळी ९. ३० वाजता डॉ. पं. केशव गिंडे आणि शिष्य 'कल्याण नवरंग सागर' हा कार्यक्रम सादर करतील. तसेच विदुषी मंजिरी आलेगावकर, बासरीवादक पं. राजेंद्र कुलकर्णी व्हायोलिनवादक पं. अतुलकुमार उपाध्ये यांची सांगीतिक जुगलबंदी यावेळी रसिकांना अनुभवायला मिळणार आहे. तसेच दुपारी ४ वाजता तिसऱ्या सत्रात 'अमर बन्सी' हा प्रसिद्ध बासरी वादक अमर ओक यांचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी गायक पं. प्रसाद खापर्डे यांचे गायन होणार आहे. याप्रसंगी डॉ.पं.केशव गिंडे यांच्या जीवनचरितत्रावरील ग्रंथ प्रकाशन, चित्रफित सादरीकरण आणि सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा होणार आहे.

# इंदूर अधिवेशनात गोमंतकीय कवींनी कविसंमेलन गाजवले



आधुनिक केसरी न्यूज

**इंदूर :** बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वतीने इंदूर ( मध्यप्रदेश ) येथे तीन दिवसीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. या अधिवेशनात अखिल भारतीय स्तरावरील कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कविसंमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी ज्येष्ठ गोमंतकीय साहित्यिका, सामाजिक कार्यकर्त्या चित्रा प्रकाश क्षीरसागर व इंदूर येथील मदन बोबडे यांनी पार पाडली. या कविसंमेलनात गोव्याच्या कालिका बापट, रजनी रायकर, चित्रा प्रकाश क्षीरसागर यांनी सहभाग घेतला. त्यांच्याशिवाय या कविसंमेलनात स्वाती घाटे, राजस्तान, विश्वनाथ शिरढोणकर, अलकनंदा साने, कल्पना चौधरी, सुषमा अवधूत, राधिका इंगळे, ऐश्वर्या डगावकर, डॉ. वसुधा गाडगीळ, मदन बोबडे या इंदूर येथील व व्यंकटेश वाकडे ग्वाल्हेर येथील कवी- कवयित्रींनी सहभाग घेतला. येथील मनीष खरगोणकर यांनी संपूर्ण कविसंमेलनाचे सूत्रसंचालन केले. राज्य मराठी संस्थेचे कार्यासन अधिकारी गिरीश पतके हे खास निमंत्रित म्हणून उपस्थित होते. ज्येष्ठ मराठी गोमंतकीय दशरथ परब कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी होते. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष मिलिंद महाजन, प्रधान कार्यवाह दिलीप कुंभोजकर कार्यवाह दीपक कर्पे आदींनी उपस्थित राहून आस्वाद घेतला. कवी संमेलनाला जगभरातील साहित्य रसिक उपस्थित होते. प्रारभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. सरस्वती देवीच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियामध्ये १४७ जागांची भरती

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सेंट्रल बँक ऑफ इंडिया अंतर्गत १४७ रिक्त जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. अर्ज ऑफलाईन पद्धतीने करायचा आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख १५ मार्च २०२३ आहे. तत्पूर्वी सेंट्रल बँक ऑफ इंडियाकडून जाहीर करण्यात आलेल्या पात्रता निकष व अर्ज प्रक्रियेची सविस्तर माहिती करून घेऊयात. पदाचे नाव – मुख्य व्यवस्थापक, वरिष्ठ व्यवस्थापक, व्यवस्थापक, सहायक व्यवस्थापक पदसंख्या – १४७ जागा, नोकरी ठिकाण – मुंबई. अर्ज शुल्क – महिला/ पीडब्ल्यूडी/ अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती – मोफत खुला प्रवर्ग- १००० रुपये + जीएसटी शैक्षणिक पात्रता निकष BTech/B.E. संगणक विज्ञान/आयटी/इलेक्ट्रॉनिक्स/ किंवा समान क्षेत्रातील उच्च पदवी पदानुसार पगार, मुख्य व्यवस्थापक- ७६,००० पासून पुढे वरिष्ठ व्यवस्थापक- ६३,००० पासून पुढे व्यवस्थापक- ४८,००० पासून पुढे सहायक व्यवस्थापक- ३६,००० पासून पुढे.



# पडोळकर वस्ती रस्त्याचे सोमनाथ आवताडे यांच्या हस्ते भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** पंढरपूर व मंगळवेढा तालुक्याचे आमदार समाधान ( दादा ) आवताडे यांनी आपल्या मतदारसंघात सध्या रस्ते,वीज,पाणी,शिक्षण,आरोग्य आदी विकासकामांना भरघोस आणि भरीव असा निधी आणून धोरणात्मक विकासाचा सपाटा सुरू केला आहे. आज दिनांक २८ फेब्रुवारी रोजी पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथील पडोळकर वस्ती ( कायरपट्टा ) रस्त्याचे भूमिपूजन सोहळा मंगळवेढा कृषी उत्पन्न बाजार समितीचे बेस्ट सभापती सोमनाथ आवताडे यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला.

यावेळी सभापती महोदय यांनी बोलताना सांगितले की, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण निधीची मागणी करताना आपण कोणतीही कसर ठेवू नका आपण मागण्या केलेल्या प्रत्येक बाबींची आमदार साहेबांच्या माध्यमातून पूर्तता करण्यात येईल. मतदारसंघाच्या सर्वांगीण उत्कर्षाचा ध्यास घेतलेले एक लोकप्रतिनिधी म्हणून मा. दादासाहेब यांची मतदारसंघांमध्ये ख्याती आहे. कोणताही राजकीय आकस मनामध्ये न ठेवता आमदार महोदय यांनी नेहमीच सर्वसामान्य जनतेच्या विकासाला प्राधान्य देऊन विकासाची गंगा नेटाने संक्रमित केली आहे. आमदार महोदय यांच्या सार्वजनिक सामाजिक व राजकीय कार्यक्षेत्रामध्ये त्यांची सोबत करणाऱ्या या गावाच्या विकासासाठी चौफेर कायापालटासाठी यापुढेही असाच निधी उपलब्ध करून देऊ असे आश्वासन सभापती महोदय यांनी यावेळी दिले.



सदर प्रसंगी विजय ( दादा ) देशमुख, तुकाराम ( आबा ) कुरे, समाधान घायाळ, बाळासाहेब देशमुख, भास्कर घायाळ, मारुती काळे, वैभव लिंगे, लक्ष्मण जाधव, सचिन देशमुख, हनुमंत ताटे, नौशाद शेख, सुनिल भुसे, दाजी खिलारे, दत्ता भुसे, वासुदेव माने, समाधान मासाळ, जगन्नाथ पडोळकर, दादा पडोळकर, राजू पडोळकर, नवनाथ खोत, अविनाश मोरे साहेब व आदी मान्यवर उपस्थित होते.

# उन्नत भारत अभियानाअंतर्गत 'दयांनद'ने केला सर्व्हे

## सेलू, सुमठाणा, चिंचोलीराव, पाखरसांगवी, बिंदगीहाळ आदी गावांचा समावेश






आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ एचआरडी अंतर्गत उन्नत भारत अभियान या सर्व्हेक्षणात सहभागी होत लातूर जिल्ह्यातील एकूण पाच गावांचा सर्व्हे केला. या महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायतच्या सहकार्याने घरोघरी जाऊन हा सर्व्हे केला. लातूर तालुक्यातील चिंचोलीराव, पाखरसांगवी, बिंदगीहाळ, रेणापूर तालुक्यातील सुमठाणा, तर औसा तालुक्यातील सेलू या गावांचा सर्व्हे करण्यात आला. ग्रामीण भागातील लोकांना मिळणाऱ्या सुविधा अन समस्या यावर उपाय योजना करण्यासाठी केंद्र सरकारच्या वतीने उन्नत भारत अभियान अंतर्गत माहिती गोळा केली जाते आहे. सदर माहिती गोळा करण्यासाठी गावांचा सर्व्हे करण्याची जबाबदारी काही महाविद्यालयांना देण्यात आली. त्यात दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचाही समावेश करण्यात आला असून, उपरोक्त पाच गावं या महाविद्यालयाला सर्व्हेसाठी देण्यात आली. महाविद्यालयाने नियोजनबद्ध पध्दतीने या गावांचा सर्व्हे करण्यासाठी सरपंच, उपसरपंच यांची बैठक घेऊन प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना सर्व्हे करिता गावांचे वाटप करण्यात आले. या सर्व्हेसाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उन्नत भारत अभियानचे नोडल ऑफिसर डॉ.साईनाथ उमाटे यांनी अत्यंत उत्तम कामगिरी बजावली. सर्वच गावातून या सर्व्हेला उत्तम प्रतिसाद मिळाला असून, एकूण कुटुंबाच्या जवळपास ८२ टक्के कुटुंबाचा सर्व्हे यात करण्यात आला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेकडे लातूर तालुक्यातील पाखरसांगवी या गावच्या सर्व्हेची जबाबदारी देण्यात आली होती. तर बँकिंग अँड इन्शुरन्सच्या समितीकडे चिंचोलीराव या गावाची जबाबदारी देण्यात आली होती. याशिवाय राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांकडे रेणापूर तालुक्यातील सुमठाणा आणि औसा तालुक्यातील सेलू या गावाची जबाबदारी देण्यात आली होती, तर बीसीए-बीबीए यांच्याकडे बिंदगीहाळ गाव सर्व्हेसाठी देण्यात आले होते. या सर्व्हेसाठी पाखरसांगवी या गावच्या सरपंच शायनाबी शेख, उपसरपंच भीमाशंकर लखादिवे, चिंचोलीराव गावचे सरपंच दत्तात्रय सप्ताळ, उपसरपंच अनुसया पिंपरे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष साहेबराव पांढरे, युवा नेते अमर पिंपरे, अनिकेत पांचाळ, किरण चोपडे, पवनकुमार गवळी, निवृत्ती गरगट्टे, सागर बोयणे, स्वप्नील तावरे, बिंदगीहाळ गावच्या सरपंच पूनम कांबळे, उपसरपंच आशाबाई शिंदे, ग्रामपंचायत सदस्य नेताजी शेंडगे, सुमठाणा गावच्या सरपंच चालूबाई शिंदे, उपसरपंच संतोष साखरे, प्रा.श्रीकृष्ण जाधव, सेलू गावच्या सरपंच कविता कदम, उपसरपंच शिवाजी पाटील, सिदाजी कदम यांनी विशेष सहकार्य केले. सदरील सर्व्हे यशस्वी होण्यासाठी प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उन्नत भारत अभियानचे नोडल ऑफिसर डॉ. साईनाथ उमाटे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.विशाल वर्मा, डॉ. गणेश लहाने, प्रा. शशिकांत स्वामी, डॉ. वैशाली सातपुते, डॉ.लक्ष्मीकांत सोनी, प्रा.योगेश शर्मा, प्रा.निखिल व्यास प्रा. लहू शेंडगे, प्रा. प्रेमसागर मुंदडा, प्रा.श्रावण बनसोडे प्रा.अक्षय पवार, प्रा.अजय चव्हाण, प्रा.अरुणा चौधरी प्रा.लता जाधव, प्रा. दिपक सुर्यवंशी, प्रा.निकिता अग्रवाल, प्रा.अनुजा कांबळे, प्रा.गितांजली जोशी, प्रा. सुनीता इंगळे, प्रा.राम पांचाळ आदींनी परिश्रम घेतले.



# ग्रामसुरक्षा यंत्रणेमुळे चोरी व दरोड्यांना आळा बसू शकेल : गणेश लोकरे

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** आपत्कालीन स्थितीत ग्रामसुरक्षा यंत्रणेच्या टोल-फ्री क्रमांकावर( 18002703600 ) फोन केल्यास एकाच वेळी गावातील सर्व नागरिकांशी संपर्क साधला जाईल. त्यातून इतरांना सावध करता येईल, तसेच मदतीसाठी बोलाविता येईल ही यंत्रणा ग्रामपंचायतीमार्फत गावात राबवली जाणार आहे.ग्रामसुरक्षा यंत्रणा ही ग्रामीण भागासाठी प्रभावी ठरेल. ग्रामसुरक्षा यंत्रणेमुळे चोरी व दरोड्यांना आळा बसू शकेल. याप्रसंगी सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी साहेबाच्या सूचनेनुसार,गणेश लोकरे ग्राम सुरक्षा यंत्रणा वरिष्ठ विभागीय

अधिकारी सोलापूर, विक्रमसिंह घाटगे जिल्हा समन्वयक, सांगोला सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब माने, सतिश शिंदे संपर्क अधिकारी ग्राम सुरक्षा यंत्रणा, अनिकेत भोसले संपर्क अधिकारी, पोलीस नाईक अवताडे, पोलीस नाईक लेंडवे आदिंसह गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामसुरक्षा यंत्रणेचे वरिष्ठ विभागीय अधिकारी गणेश लोकरे मार्गदर्शन करताना म्हणाले, ग्राम सुरक्षा यंत्रणा प्रभावीपणे राबवल्यास जिल्ह्यातील गुन्हेगारी कमी होण्यास व जिल्ह्यातील महत्त्वाची माहिती नागरिकांपर्यंत तत्काळ पोहोचवणे सुलभ होईल. ग्राम सुरक्षा यंत्रणेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहे. संपूर्ण स्वयंचलित यंत्रणा आहे. गावासाठी यंत्रणा सुरू करणे व सहभागी होण्यासाठी सोपी पध्दत आहे.संपूर्ण भारतासाठी एकच टोलफ्री नंबर 18002703600 आहे. यंत्रणेत सहभागी असलेला कोणताही नागरिक आपत्ती काळात संपूर्ण परिसराला सावध करू शकतो. संदेश देणाऱ्या व्यक्तीच्या आवाजातच संदेश कॉल स्वरूपात परिसरातील नागरिकांना मिळतो. एका गावात चोरी करून चोर दुसऱ्या गावच्या दिशेने गेल्यास त्या गावालाही सावध करणे शक्य आहे.

यावेळी याप्रसंगी सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी साहेबाच्या सूचनेनुसार,गणेश लोकरे ग्राम सुरक्षा यंत्रणा वरिष्ठ विभागीय अधिकारी सोलापूर ,विक्रमसिंह घाटगे जिल्हा समन्वयक, सांगोला सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब माने,सतिश शिंदे संपर्क अधिकारी ग्राम सुरक्षा यंत्रणा, अनिकेत भोसले संपर्क अधिकारी,पोलीस नाईक धनंजय अवताडे,पोलीस नाईक विशाल लेंडवे, युवक, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैजापूरात पालिका विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वैजापूर येथील नगर पालिकेच्या मौ,आझाद विद्यालयात "राष्ट्रीय विज्ञान दिन"निमित्त मंगळवार( ता,२८ ) रोजी भारतीय शास्त्रज्ञ सी,व्ही,रमण यांच्या स्मृतींना अभिवादन करून विविध वैज्ञानिक उपक्रम आयोजित करून हा दिन साजरा करण्यात आला,माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत हे प्रमुख वक्ते होते.

भारतीय शास्त्रज्ञ सी,व्ही,रमण यांचा २८फेब्रुवारी हा जन्म दिवस आहे, त्यांचा जन्म दिन हाच "राष्ट्रीय विज्ञान दिन" म्हणून देशभर साजरा करतात,,प्रथम रमण यांना अभिवादन करण्यात आले,राजपूत यांनी या निमित्त आयोजित वैज्ञानिक रांगोळी प्रदर्शन चे उदघाटन केले, या सर्व रांगोळ्या विद्यार्थ्यांनी विज्ञान पर्यावरण वर आधारित काढलेल्या आहेत.

नंतर विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक व शास्त्रीय दृष्टीकोन समोर ठेऊन समाजातिल नागरिकांच्या मनातील अंधश्रद्धा,जुन्या रूढी,परंपरा घालविण्यासाठी सर्वंकष प्रयत्न कारावेत, ज्ञान, विज्ञान व माहिती तंत्रज्ञानाच्या या युगातअंधश्रद्धा ला थारा नसावा असेही ते पुढे म्हणाले,,विज्ञान शिक्षिका श्रीमती पी. ए. भाकरे यांनी रांगोळी प्रदर्शनात पुढाकार घेतला त्यांना के.एस. रावकर, व्ही.आर.तगरे, सुनीता वसावे, श्रीमती टी. व्ही.घोलप यांनी सहकार्य केले. संचलंन श्रीमती भाकरे यांनी केले तर रावकर यांनी आभार मानले.



# मालमोटरची दुचाकीला धडक तिघांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** भरधाव मालमोटरने धडक दिल्याने दुचाकीवरील तिघेजण ठार तर एक महिला गंभीर जखमी झाली. मृतांमध्ये लष्करी जवानासह एक बालकाचा समावेश आहे. खामगाव तालुक्यातील आंबेटाकली ते बोरी अडगाव मार्गावरील बोरी अडगाव शिवार परिसरात मंगळवारी रात्री ही दुर्घटना घडली. श्रीकांत सुरवाडे ( २६ ), हार्दिक रोहित वानखडे ( ४ ), कल्पना सुरवाडे ( ३४ ) रा. बोरी आडगाव, अशी मृतांची नावे आहेत. यात पूजा रोहित वानखडे ( २६ ) या गंभीर जखमी झाल्या आहे. लष्करातील जवान व काश्मीर मध्ये कार्यरत असलेला श्रीकांत सुरवाडे ( २६ ) हा सुट्टीवर बोरी अडगाव येथे आला होता. मंगळवारी हार्दिक चार वर्षीय बालकाची प्रकृती बिघडल्याने तो काकू कल्पना व वहिनी पूजा यांना दुचाकीने घेऊन लाखनवाडा आरोग्य केंद्रात जात होता.

# भाजपाची महाविजय -२०२४ अभियान संयोजन समिती घोषित

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या तयारीच्या दृष्टीने भारतीय जनता पार्टीने महाविजय २०२४ अभियान जाहीर केले असून या अभियानाची संयोजन समिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी घोषित केली. या अभियानाचे प्रदेश संयोजक म्हणून आ. श्रीकांत भारतीय यांची नियुक्ती करण्यात आली आहे . संयोजन समितीच्या सदस्यपदी प्रदेश उपाध्यक्ष सुनील कर्जतकर, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवीन्द्र अनासपुरे, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक, प्रदेश सचिव श्वेता शालिनी, अरविंद निलंगेकर , संजय फांजे, नवनाथ बन , मुंबई भाजपा सरचिटणीस संजय उपाध्याय यांची नियुक्ती करण्यात आली आहे. २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत संपूर्ण विजय हे लक्ष्य ठेवून या अभियानाची आखणी करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील, मुंबई अध्यक्ष आ. आशीष शेलार हे या समितीचे विशेष निमंत्रीत आहेत.

# सातारच्या महिलेने पंढरीतील भीमा नदीत मारली उडी

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** येथील अहिल्या पुलावरून भिमा नदीपात्रात आज दुपारच्या सुमारास सातारा येथील आशाबाई विठ्ठल बिडकर या महिलेने जीवन संपवण्याच्या उद्देशाने उडी मारली. परंतु देव तारी त्याला कोण मारी याची प्रचिती या ठिकाणी दिसून आली भीमा नदी पात्रामध्ये मासेमारी करणार्या संजय किसन भोई या युवकाने सदर महिलेने उडी मारल्याचे पाहून क्षणाचाही विचार न करता तिला वाचवण्यासाठी धावला व तिला पाण्यातून बाहेर काढले.

तीर्थक्षेत्र पंढरीत श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक येत असतात. आधी चंद्रभागा स्नान मग दर्शन विठ्ठलाचे या ओळीप्रमाणे येणारा प्रत्येक भाविका चंद्रभागे स्नान करून विठ्ठल दर्शनाला जातो परंतु सातारा येथील एका महिलेने पारिवारिक समस्येतून पंढरपुरात उडी मारण्याची माहिती पुढे येत आहे. येथील अहिल्या पुलावरून आशाबाई विठ्ठल बिडकर ( वय ४० वर्षे ) रा. बिडकरवाडी जि.सातारा ही महीला विठ्ठल दर्शनासाठी पंढरीत आली होती. दुपारच्या सुमारास सदर महिलेने भिमा नदीपात्रात उडी घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्या ठिकाणी नदीपत्रांमध्ये मासेमारी करीत असलेल्या संजय किसन भोई या देगाव येथील युवकाने प्रसंगावधान राखत क्षणाचाही विचार न करता पोहत जाऊन सदर महिलेस बुडत असताना वाचवले. तेथे उपस्थित असलेल्या इतर नागरिकांची मदत घेऊन १०८ ॲम्बुलन्स ला फोन केला सदर आशाबाई बिडकर या



महिलेला येथील उपजिल्हा रुग्णालयात येथे उपचारासाठी पाठविण्यात आले. सदर महिला ही मानसिक दृष्ट्या काहीशी मतिमंद असल्याचे घटनास्थळी बोलले जात होते. मात्र मच्छीमारी करणाऱ्या युवकाने प्रसंगीच बुडणाऱ्या महिलेला बघितल्याने त्या महिलेचे प्राण वाचले आहेत.

# दिल्लीच्या 'हमदम' नावाच्या कंपनीचा अनधिकृत वापर; दोघांना नोटीस

## कंपनीच्या नावे विक्री करीत होते कँडी आणि रोल

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दिल्ली येथील एका कंपनीच्या प्रोडक्टची अनाधिकृतपणे कंपनीचे नाव लावून ते प्रोडक्ट छत्रपती संभाजी नगरात तयार करुन विक्री करणाऱ्या दोघांना दिल्ली येथील वाणिज्य न्यायालयाने नेमलेल्या लोकल कमिशनर मार्फत नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच कंपनीचे प्रोडक्टची कॉपी राईट केल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आल्याने लोकल कमिशनरने कंपनीच्या मशीन्स (प्लॉट 48, गट नं.15, मोसंबी बाग नारेगाव, औरंगाबाद) येथे सील केले व उत्पादन बंद करण्याचे आदेश दिले. त्याचा अहवाल लवकरच दिल्ली न्यायालयात सादर करण्यात येणार आहे. अशी माहिती कंपनीचे वकील अ‍ॅड. कपीलकुमार गिरी यांनी दिली.

हमदम फुड प्रोडक्ट ग्रह उद्योगचे अन्वर खान (प्लॉट. क्रं. 50, गेट क्रं.14, नारेगाव, औरंगाबाद) आणि Humdum जेएचयू फुडचे नावेद खान (प्लॉट क्रं. 50, गेट क्रं.14, नारेगाव, औरंगाबाद) अशी नोटीस बजाविण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. दिल्ली येथे अल्का कनफेक्शनरी प्रा.लि. ही कंपनी 1977 पासून सुरु आहे. कंपनीने 2004 रोजी हमदम नावाने कँडी, चॉकलेट (लहान मुलांची गोळी) विक्री सुरु केली. दिल्लीवरुन हे प्रोडक्ट संपूर्ण भारतात विक्री करण्यात येतात. मात्र छत्रपती संभाजीनगरात हमदम नावाने बनावट कँडी व चॉकलेटची विक्री सुरु असल्याची माहिती अल्का कनफेक्शनरी कंपनीला मिळाली. त्यानूसार, कंपनीने दिल्ली येथील वाणिज्य न्यायालयात तक्रार नोंद केली. तक्रारीनूसार, दिल्ली वाणिज्य न्यायालयाचे जिल्हा न्यायाधिश गुरदिप सिंग यांनी प्रकरणात लोकल कमिशनर म्हणुन अ‍ॅड.अमरित सिंग यांची नियुक्ती केली. व तक्रारीच्या अनुषंगाने तपास करण्याचे आदेश दिले. त्यानूसार लोकल आयुक्त अ‍ॅड.अमरित सिंग यांनी 25 फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गाठत हमदम नावाने बोगस कंपनी चालविणाऱ्या अन्वर खान आणि नावेद खान यांना नोटीस बजावत. कंपनीची झडती घेतली. त्यात अन्वर व नावदे हे दोघे हमदम कंपनीचे लेबल लावून ईमली रोल आणि कँडी हे प्रोडक्ट तयार करुन विक्री करित असल्याचे समोर आले. त्यानंतर अ‍ॅड.सिंग यांनी कंपनीच्या मशिन्स सिल केल्या असून त्याचा अहवाल लवकरच दिल्ली येथील वाणिज्य न्यायालयात सादर करण्यात येणार आहे. कंपनीच्या वतीने अ‍ॅड.कपीलकुमार गिरी, अ‍ॅड.हितेशी कक्कड आदी काम पाहत आहेत.








# समर्पित शिक्षकच विद्यार्थी घडवू शकतो

## शिवाजी राजे जाधव : कॅप्टन प्रा.व्ही.के. देशमुख, राजेंद्र भोसले सेवानिवृत्त

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** सच्चा शिक्षक अनेक पिढ्यांची पायाभरणी करतो. समर्पित शिक्षकच समर्पित विद्यार्थी घडवू शकतो, हे कार्य कॅप्टन प्रा. व्ही.के.देशमुख यांनी केले आहे, असे प्रतिपादन सिंदखेडराजा येथील लखोजी राजे जाधव यांचे वंशज शिवाजी राजे जाधव यांनी (ता.२८) केले.

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, रामराव पाटील बहिरगावकर एमसीव्हीसी महाविद्यालयातील शिक्षक कॅप्टन प्रा. व्ही.के. देशमुख व कर्मचारी राजेंद्र भोसले हे सुमारे तीस वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झाले, याबद्दल त्यांचा श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने नागरी सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला. याप्रसंगी शिवाजी राजे जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ते म्हणाले की, श्री देशमुख यांनी एनसीसीचे कॅप्टन म्हणून प्रभावी काम केले. शिस्त,सचोटी आणि बांधिलकी यामुळे अनेक विद्यार्थी त्यांनी घडवले. राजेंद्र भोसले यांनी संस्थेची सेवा केली. त्यामुळेच संस्थेला विकास साधता येतो. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव , अशोक अण्णा आहेर होते. या वेळी व्हिडिओ कॉन्फरसद्वारे विधान भवनातून आमदार उदयसिंह राजपूत यांनी भाषण केले, त्यानंतर प्रा. हुकुमचंद पवार, आथरखान भाईजी, वसीम शेख, युवराज शिरसाट, डॉ.कारभारी भानुसे, डॉ. शिवाजी हुसे, माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, उद्धव ठाकरे शिवसेना गटाचे उप तालुकाप्रमुख शिवाजी थेटे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. अण्णा शिंदे, संस्थेचे संचालक बाबासाहेब मोहिते, पोलीस उपनिरीक्षक युवराज शिरसाठ, यशोवर्धन देशमुख आदींची समोचित भाषणे झाली. प्राचार्य डॉ. विजय एन.भोसले म्हणाले की,संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या प्रति



बांधिलकी असलेले प्राध्यापक शिक्षक कर्मचार्यांमुळेच संस्थेला विधायक कार्य करता येते. ते सेवानिवृत्त झाले म्हणून संस्थेचे त्यांचे ऋणानुबंध संपत नाहीत. अशा कर्मचाऱ्यांची सेवा पुढील काळातही हक्काने घेण्यात येईल. व्यासपीठावर उद्योजक मनोज पवार, डॉ. एक.के. महाले, जिभाऊ पवार, प्रा. अशोक बारवकर, प्रा. आर.बी. बोरसे, प्रा. रंगनाथ लहाने, उपप्राचार्य बी.के.मगर आदींची उपस्थिती होती यावेळी कॅप्टन देशमुख,सौ.इंदुताई देशमुख व राजेंद्र भोसले,सौ.सुनिता भोसले यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी डॉ मुकुंद सोमवंशी, श्याम महाले, एडवोकेट जयसिंग देशमुख, सुधाकर देशमुख, दिलीप पवार, राजू पवार, अजय देशमुख, गोकुळ राठोड करण राजपूत, काकासाहेब कवडे, अनितताई कवडे, प्रा.प्रतिभा अहिरे,प्रा.एस.एन.पवार, प्रा.अविनाश भोसीकर,प्रा.स्वाती भोसले,प्रा.विजय देशमुख, सचिन वाघ,वसीम शेख, कांबळे, राऊत, रोहीत जाधव आदिंसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.यावेळी विद्यार्थ्यांनी कॅप्टन देशमुख यांचा हृद्य सत्कार केला. सत्काराला उत्तर देताना देशमुख म्हणाले की, विद्यार्थ्यांनी केलेला सत्कार अविस्मरणीय आहे. कुटुंबात चर्चा करून पुढील वाटचाल ठरवणार आहे. प्रास्ताविक व सुत्रसंचलन डॉ.प्रकाश खेत्री यांनी तर आभार प्रा. अभिजित मांडे यांनी मानले. प्रा. एस.ए.देशमुख, प्रा. एन. बी.संगवे, प्रा. एच. जी. पवार, प्रा. योगीराज सोमवंशी आदींनी विशेष प्रयत्न केले.

# द्राक्ष व्यापाऱ्याकडून शेतकऱ्याची फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** द्राक्ष हंगामाला सुरुवात होताच व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांच्या फसवणुकीचे प्रकार घडू लागले असून दिंडोरी तालुक्यातील हस्तेदुमाला येथील शेतकऱ्याकडून ४० लाखांहून अधिक किंमतीचा द्राक्षमाल खरेदी करून व्यापाऱ्याने आर्थिक व्यवहार पूर्ण केला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शेतकऱ्याच्या तक्रारीनंतर वणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हस्तेदुमाला येथील गणेश महाले यांचे द्राक्षपीक काढणीला आल्यावर व्यापारी महंमद अहमद अन्वर (रा. बिहार) याने महाले यांच्याशी संपर्क साधला. महाले यांच्या शेतातील सोनाका द्राक्षे खरेदीचा व्यवहार केला. ४९ लाख, १९ हजार ५०२ रुपयांचा माल खरेदी केला. परंतु, याबाबत रोख किंवा धनादेशाद्वारे कुठलेही पैसे दिले नाही. पाठपुरावा करूनही पैसे मिळत नसल्याने महाले यांनी वणी पोलीस ठाण्यात अन्वरविरूध्द तक्रार दाखल केली.

# घरासमोरुन कार चोरली

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सुराणानगरात काल मंगळवारी ६ वा. घरासमोर पार्क केलेली कार अज्ञात चोरट्याने लंपास केल्याचा गुन्हा जिन्सी पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे. अमरदीप पंढरीनाथ घुगे (४६) रा.सुराणानगर असे फिर्यादीचे नाव आहे. या प्रकरणी पुढील तपास पोलिस निरीक्षक अशोक भंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय हारुण शेख करत आहेत.



# रमेश शिंदे यांना राज्यस्तरीय पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील कर्मचारी रमेश काकासाहेब शिंदे यांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे साहित्य लेखन पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे 17 वे कामगार साहित्य संमेलन नुकतेच बालगंधर्व नाट्यमंदिर, मिरज (सांगली) येथे झाले. त्यानिमित्त कामगारांच्या साहित्यिक कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने कामगारांसाठी राज्यस्तरीय साहित्य लेखन स्पर्धेचे आयोजन मंडळातर्फे करण्यात आले होते. या स्पर्धेत रमेश शिंदे यांना 'राष्ट्र उत्थानासाठी कामगारांचा सहभाग' या विषयावरील वैचारिक लेखन या साहित्य प्रकारात राज्यस्तरीय प्रथम 'लोकहितवादी' पुरस्कार मिळाला. तसेच 'सल' या कवितेसाठी काव्य लेखन या साहित्या प्रकारात 'पद्मश्री नारायण सुर्वे' उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी यांच्या हस्ते शिंदे यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्रासह पुरस्कार देऊन सन्मानित गौरविण्यात आले.

याप्रसंगी कामगारमंत्री सुरेश खाडे, संमेलनाध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, कल्याण आयुक्त रविराज इळवे उपस्थित होते. शिंदे हे सध्या हिवरा 33 केव्ही उपकेंद्रात यंत्रचालक म्हणून कार्यरत आहेत. ते मूळचे औरंगाबाद तालुक्यातील वाहेगाव देमनी येथील रहिवासी आहेत. महाविद्यालयीन स्तरावर आपल्या अभिनय कौशल्याने विविध युवक महोत्सव, राष्ट्रीय आंतरविद्यापीठ स्पर्धा गाजवणाऱ्या शिंदेंनी महावितरणसह कामगार नाट्य स्पर्धा व राज्य नाट्य स्पर्धांतही विविध पारितोषिके पटकावलेली आहेत. उत्कृष्ट निवेदक, सूत्रसंचालक असलेलया शिंदेंचे 'उद्योगाचा कणा : कामगार आणि वास्तव' हे पुस्तक प्रकाशित झालेले असून. कवितासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. कामगार चळवळीतही ते सक्रीय आहेत.

# पुण्यात पहिल्यांदाच संत महंतांचे भव्य संमेलन व दर्शन

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन; महंत, नागा साधू यांची उपस्थिती




आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महामंडलेश्वर शिवानंद महाराज प्रतिष्ठान व मातोश्री विजयाताई नाईक सामाजिक फाउंडेशनच्या पुढाकारातून महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच पुणे शहरात भव्य संत संमेलन व दर्शन सोहळा होत आहे. हे संमेलन येत्या रविवारी (दि. ५ मार्च) वर्धमान सांस्कृतिक भवन, गंगाधाम चौक, पुणे येथे होणार आहे, अशी माहिती गुरुवर्य प्रकाशभाऊ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संयोजक राहुल गोसावी, शिवाजी करंजुले, अतुल भोसले, नंदकिशोर शहाडे आदी उपस्थित होते.

प्रकाशभाऊ शिंदे म्हणाले, "या संत संमेलनात श्री शिवशक्ती कालिदास धाम संपाला हरियाणा येथील महंत श्री. श्री. श्री. १००८ कालिदास महाराज,पंचदशनाम जुना आखाड्याचे महामंत्री श्री. श्री. श्री. १००८ अशोक महाराज, पंचदशनाम जुना आखाडा हरिद्वार येथील महामंडलेश्वर श्री. श्री. श्री. १००८ प्रेमगिरी महाराज, श्री. श्री. श्री. १००८ हरिगिरी महाराज, किन्नर जुना आखाड्याचे महामंडलेश्वर १००८ आचार्य लक्ष्मीनंद गिरी, महामंडलेश्वर शिवानंद महाराज यांच्यासह अनेक मठाधिपती, ५०० नागा साधू, १५ वाचासिद्धी संत, महात्मे उपस्थित राहणार आहेत. मठाधिपती भवानीमाता (हरिद्वार), नाथजी महाराज (नर्मदा खंड, मध्यप्रदेश), गरीबदास महाराज (मोठा महादेव, मध्यप्रदेश), साई हबीब महाराज (हैद्राबाद), भारतजी महाराज (वाराणसी), वाईकर महाराज (सातारा), महेश स्वरस्वती महाराज (दत्तधाम, तुळजापूर), दिलीप बाबू गणोरकर (अमरावती) यांच्या दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. या अभूतपूर्व सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक, पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय संसदीय मंडळाचे सत्यनारायण जाटिया, राष्ट्रीय सुरक्षा मंचाचे महामंत्री गोपाळ गुप्ता, आमदार भारत गोगावले, आमदार श्वेता महाले, आमदार भीमराव तापकीर, आमदार माधुरी मिसळ, आमदार चेतन तुपे, आमदार महेश लांडगे, भाजपच्या माथाडी कामगार आघाडीचे अध्यक्ष शिवाजी पाटील यांची उपस्थिती असणार आहे, असे शिंदे म्हणाले.

या संत व महंत संमेलनात विश्वशांती महायज्ञ, सुमधुर सुंदरकांडाचे प्रस्तुतीकरण, भजन व प्रवचन, मुक्त भांडारा, गोमाता पूजन आदी कार्यक्रम होणार आहेत. हरिद्वारवरून आणलेल्या एक हजार लीटर गंगाजल मध्ये हा महाप्रसाद शिजवला जाणार आहे. यासह गुरुवर्य प्रकाशभाऊ शिंदे निर्मित भारतातील एकमेव जागृत अकरा मारुती मठाचा आणि मठाधिपती पदाचा मुहूर्तमेढ सोहळा, मातोश्री विजयाताई नाईक सामाजिक राष्ट्रीय फाउंडेशनचे लोकार्पण व संकेतस्थळाचे उद्घाटन, १० मुलांचे शैक्षणिक पालकत्व आणि ५१ अंध मुलांना शालेयपयोगी साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. या संमेलनाच्या यशस्वीतेसाठी अतुल नरहरी भोसले, राहुल गोसावी मित्र परिवार, महामंडलेश्वर शिवानंद महाराज प्रतिष्ठान, सर्वात्मक महारुद्र परिवार, मैत्री प्रतिष्ठान, शशिकांत कांबळे, ललित तींडे, भरत मिसाळ, डॉ. इंद्रजित यादव, ऍड. महेंद्र दलालकर, निलेश आवटे, चिमाजी आहेर, पंकज महाले आदी परिश्रम घेत असल्याचे नंदकिशोर शहाडे यांनी सांगितले.

# चिंचोली लिंबाजी येथे सैन्य दलात प्रमोशन झालेले बाळु पवार यांचा वंचिततर्फे सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**चिंचोली लिंबाजी :** येथे बुधवार दि. 1 मार्च रोजी वार बुधवार या दिवशी भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेले बाळु साहेबराव पवार यांची सैन्य दलातुन संरक्षण मंत्रालय सिवल इंजियर या पदी निवड झाल्याबद्दल वंचित बहुजन आघाडी तर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी वंचित कार्यकर्ते तातेराव भुजंग यांच्या हस्ते श्रीफळ व शाल देऊन फौजी साहेब यांच्या सत्कार करण्यात आला. यावेळी दिपक दांडगे यांनी फौजीला पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित भागवत चौतमोल वाकोद, अमृत चौघुले, सुरेश भारुडे, काशिनाथ पवार, गिरी महाराज टाकळी अंतुर व ईतर ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.





# जिजामाता कन्या शाळेत आनंद मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** तालुक्यातील बेंबळी येथील जिजामाता कन्या माध्यमिक विद्यालयात सेव्ह द चिल्ड्रन (बाल रक्षा भारत या संस्थेच्या वतीने आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सेव्ह द चिल्ड्रन या संस्थेच्या माध्यमातून धाराशिव तालुक्यातील एकूण वीस माध्यमिक शाळेत किशोरवयीन मुलींच्या सशक्तीकरणासाठी सहकार्य करण्याच्या उद्देशाने काम सुरू असल्याचे प्रकल्प समन्वयक अमोल धावडे यांनी सांगितले यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका रजनी गोडबोले, भाग्यश्री खापरे मान्यवर म्हणून उपस्थित होत्या.या आनंदमेळाव्यात शाळेतील सर्व मुलांनी भाग घेतला होता ज्यात मैदानी खेळ, सामुहिक खेळ (क्रिकेट, डॉज बॉल), वैयक्तिक खेळ (धावण्याची स्पर्धा, गोळा फेक) व विविध प्रकारचे मजेशीर खेळ घेण्यात आले. विजयी संघांना संस्थेच्या माध्यामतून बक्षीसे देऊन खेळाडू विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. अशा प्रकारे धाराशिव तालुक्यातील वीस शाळांमध्ये अशाच स्वरूपाच्या आनंदमेळाव्याचे आयोजन करण्यात येणार असल्याचे संस्थेचे कार्यकर्ते नागेश धावरे यांनी सांगितले. कोविड १९ या आजारामुळे आरोग्य, शिक्षण ई. यंत्रणांवर परिणाम झाला आहे. २ वर्ष शाळा बंद असल्याने मुलांचा अभ्यास खूपच मागे पडला आणि त्यात मुलींच्या शिक्षण प्रवाहात टिकून राहणे आणि त्यांची प्रगती यावर खूप जास्त प्रमाणात परिणाम झालेला आढळतो. मुलींनी शाळा सोडून देणे किंवा शाळेत न येणे यामध्ये देशात महाराष्ट्र सातव्या क्रमांकावर आहे. या साठी मुलींची शिक्षणातील रुची टिकून राहावी, आणि शाळा गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी हा प्रकल्प राबविण्याचा मानस असल्याची माहिती अर्जुन चौघुले व प्रिती सिरसट यांनी दिली. बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात अमोल धावडे म्हणाले की किशोरवयीन मुलींचे शाळेतील गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी ओरॅकल फायनाशियल सर्व्हीसेस सॉफ्टवेअर लि. कंपनीच्या सहकार्याने धाराशिवमध्ये सेव्ह द चिल्ड्रन संस्थेच्या वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापिका प्रणामी गर्ग, व प्रकल्प समन्वयक दिपाली देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली वीस शाळांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

# आजपासून दहावीची परीक्षा सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** विद्यार्थ्यांच्य उद्याचं भवितव्य व करिअरच्या दृष्टीने दहावी बोर्ड परीक्षा महत्त्वाची मानले जाते. आज पहिला पेपर मराठीचा आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या लातूर विभागातून दहावीची परीक्षा घेतली जात आहे. एकूण 21 हजार 983 विद्यार्थ्यांची दहावीच्या परीक्षेसाठी नोंद झालेली आहे. या परीक्षेसाठी जिल्ह्यात86 मुख्य केंद्रवर हि परीक्षा आयोजित करण्यात आलेली आहे. यामध्ये धाराशिव-23, तुळजापूर-14, लोहारा-08, उमरगा-12, कळंब-11, वाशी-3, भूम-06, परंडा-09 असे एकूण 86 केंद्रावर परीक्षा असणार आहे. शिक्षण मंडळाकडून विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या बहुतांश विषयाच्या पेपरमध्ये खंड ठेवण्यात आला आहे. परीक्षेच्या दडपणाखाली असलेल्या विद्यार्थ्यांना नैराश्य येऊ नये किंवा नैराश्यातून बाहेर काढण्यासाठी जिल्हास्तरावर समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे. पूर्वीप्रमाणेच निर्धारित वेळेतच विद्यार्थ्यांना पेपर सोडवावा लागणार आहे. आठ भरारी पथके देखील परीक्षेच्या कालावधी त विविध केंद्रांना भेटी देणार आहेत. आणि 86 बैठे पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

# सांगलीकर अनाथपिंडक पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**जत :** सांगली जिल्ह्यातील गुगवाड (ता. जत) येथील उद्योजक सी.आर. सांगलीकर यांना आळंदी (पुणे) येथे अनाथपिंडक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. रसिकलाल एम धारीवाल संकुल,आळंदी (पुणे) येथे बुद्ध विहार समन्वय समितीने आयोजित केलेले बुद्ध विहारांचे २ रे राष्ट्रीय अधिवेशन पार पडले. यावेळी हा सन्मान करण्यात आला.

सांगली जिल्ह्यातील उद्योजक सी.आर. सांगलीकर यांनी सांगली जिल्ह्यातील त्यांच्या जन्मगावी गुगवाड येथे स्वतः च्या तब्बल वीस एकर जागेत तब्बल पंधरा कोटींचे देखणे प्रशस्त, स्वखर्चाने "धम्मभूमी" बुद्ध विहार उभारले आहे. गेल्या 12 नोव्हेंबर 2022 रोजी या "धम्मभूमी" चा लोकार्पण सोहळा पार पडला. महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांतील अंदाजे दोन लाख धम्मबांधवांच्या उपस्थितीत होते. सांगलीकर यांच्या तन, मन,धनाने करत असलेल्या प्रामाणिक धम्म कार्याचा गौरव म्हणून बुद्ध विहार समन्वय समितीने अनाथपिंडक हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले आहे. श्री. सांगलीकर निस्वार्थीपणे धम्म कार्य करत असल्याने कार्यक्रमास विविध भागांतून आलेल्या प्रतिनिधींनी त्यांच्या बरोबर धम्म कार्याबद्दल चर्चा केली.

बुद्ध विहारांच्या दुसऱ्या अधिवेशनाचे मुख्य संयोजक अशोक सरस्वती , मुख्य आयोजक गजानन पडघम तर स्वागताध्यक्ष आचार्य अशोक प्रियदर्शनी होते. तसेच यावेळी गोव्यातील पहिल्या बुद्ध विहारचे डॉ.उल्हास चांदेलकर, नाशिकचे प्रविण गांगुर्डे यांच्यासह विविध ठिकाणचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बुद्ध समन्वय समितीमध्ये भारतीय बौद्ध महासभा,समन संघ, बौद्ध विकास महासंघ, बुध्दीस्ट फ्रटरनिटी मुव्हमेंट राजस्थान, बौद्ध महा संघ गुजरात, बुद्ध विहार संकलन समिती,समता सैनिक दल, तिबेटीयन बौध्द समाज,नशनल को-आर्डीनेशन कमिटी आफ बुद्धीस्ट आर्गनायजेशन (इंडिया) या भारतातील संस्थांचा समावेश आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in